त्रास न मानता तो गुरूंचा संतोष करण्याचा प्रयत्न करी. गुरूसेवा सोडून गंगास्नान, काशीविश्वेश्वर दर्शन, प्रदक्षणा, प्रप्रवचन आदी कोणत्याही पारमार्थिक कार्याकडे त्याचे मन धावत नव्हते.

**समस्त देव माता पिता ।**
**गुरूचि होय ऐसे म्हणता ।**
**निश्चय केला असे चित्ता ।**
**गुरू परमात्मा म्हणोनि ।**

असा गुरूविषयी त्याचा निष्ठाभाव एकविध झालेला होता.त्याची ही गुरू भक्तीपाहून काशीविश्वेश्वर शंकर भगवान संतुष्ट होतात व त्यास प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगतात. भगवान शंकराच्या कृपेने आपल्या गुरुचा कुष्ठरोग बरा होईल व ते व्याधीमुक्त होतील या आनंदाने शिष्य दीपक गुरू वेदधर्माकडे येतो व भगवान शंकरांनी प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितल्याचे वृत्त कथन करून 'आपला कुष्ठरोग बरा होवो' असा वर मागण्यास परवानगी द्यावी म्हणून विनंती करतो. पण गुरू वेदधर्म असा वर मागण्यास नकार देतात. तेव्हा शिष्य दीपक मला कोणताच वर नको आहे असे भगवान शंकरास सांगून पूर्ववत आपल्या गुरूसेवेत रमून जातो.

### ॥देव देवतांना आश्चर्य ॥

शिष्य दीपकाच्या गुरूनिष्ठेने आश्चर्यचकित झालेले भगवान शंकर आपल्या दरबारामध्ये भगवान विष्णू-भगवान ब्रह्मदेव आदी देवदेवतांना एकत्र करून शिष्य दीपकाची कथा सांगतात. ही कथा ऐकून भगवान विष्णू शिष्य दीपकाला पाहण्यास व त्याची परिक्षा घेण्यास जातात.

नेहमीप्रमाणे शिष्य दीपक आपल्या गुरूसेवेत मग्न असतानाच अचानक भगवान विष्णू त्यांच्यापुढे प्रकट होतात. 'तुझ्या गुरूभक्तीने आम्ही संतुष्ट झालो आहोत व तुला वर देण्यास आलो आहोत, काय पाहिजे तो वर माग' असे दीपकास म्हणतात. यावर दीपक त्वरित उत्तर देताना म्हणतो-"हे भगवान, मी ना तुझी भक्ती केली - ना तुझे स्मरण केलेले आहे मग तू मला उगाचच प्रसन्न होऊन वर कशाला देतोस."

**गुरूपासोनि सर्व ज्ञान ।**
**त्रयमूर्ति होती आम्हा आधीन ।**
**आमुचा देव गुरूचि जाण ।**
**अन्यथा नाही आपणासी ॥**

हा दीपकाचा गुरूभाव पाहून भगवान विष्णू अधिकच संतुष्ट झाले.आणि त्यांनी काही ना काही वर मागण्याचा शिष्य दीपकास आग्रह केला. भगवान विष्णुंना नाराज करू नये या भावनेने अखेर शिष्य दीपक वर मागण्याचे ठरवितो पण धन, दौलत, वैभव वा सायुज्य मुक्ती आदी गोष्टी न मागता आपली गुरुभक्ती दृढ होईल असा वर द्या असे भगवान विष्णूंना वंदन करून विनवितो दीपकाने केलेल्या या मागणीने भगवान विष्णुंचा आनंदास पारावार राहात नाही 'धन्य तो गुरू व धन्य तो शिष्य' असे गौरवोद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडतात 'तथास्तु' म्हणून भगवान विष्णू अंतर्धान पावतात

### ॥ गुरूनिष्ठेचा आदर्श ॥

भगवान विष्णू प्रगट झाल्याची व आपणास वर दिला असल्याची साद्यंत कथा शिष्य दीपक गुरूवर्य वेदधर्म यांना सांगतो. विष्णुंनी कोणता वर दिला? असे अधिरतेने गुरूवर्य विचारतात तेव्हा शिष्यवर दीपक म्हणतो -

**दीपक म्हणे गुरूसी ।**
**वर दिधला हृषीकेशी ।**
**म्या मागितले ऐसी ।**
**गुरूभक्ति व्हावी म्हणोनि ॥२६५॥**
**गुरूची सेवा तत्परेसी ।**
**अंतःकरणी दृढ शुद्ध ऐसी ।**
**वर दिधला संतोषी ।**
**दृढ भक्ति तुमचे चरणी ॥२६६॥**

शिष्याचे हे वचन ऐकताच गुरू वेदधर्मांचा आनंद गगनात मावेना.अपार संतुष्ट होऊन त्यांनी शिष्य दीपकाचा शिष्य शिरोमणी असा गौरव केला व तुझ्या स्मरणाने, नावाने काशी क्षेत्री येणाऱ्या भाविकास काशीविश्वेश्वर आधीन होईल असा त्यास आणखी एक वर देतात.

या शिष्यदीपक आख्यानाने आपली गुरूभक्तीही अढळ व्हावी. या आख्यानाचे केवळ एकाच ओवीत सार सांगायचे झाले तर ते पुढील प्रमाणे सांगता येईल -

**दृढ भक्ती असे जयापाशी ।**
**त्रिकरणसह मानसी ।**
**तोचि लाधे ईश्वरासी ।**
**ईश्वर होय तया वश्य ॥ २७७॥**

॥श्री गुरूदेवदत्त ॥

ॐ ॐ ॐ

# सद्‌गुरू स्तोत्र

गुरू! गुणालया! परापराधिनाथ सुंदरा!
शिवादिकाहुनी वरिष्ठ तूंचि एक साजिरा।
गुणावतार तू धरोनिया जगासि तारिसी।
सुरां मुनीश्वरा अलभ्य त्या गतीस दाविसी ॥१॥

जया गुरुत्व बोधिले तयासि काय साधिलें।
भवार्णवासि लंघिलें सुविघ्नदुर्ग भंगिलें।
सहा रिपूंसि जिंतिलें निजात्मतत्त्व चिंतिलें।
परात्परांसि पाहिलें प्रकृष्ट दुःख साहिलें ॥२॥

गुरू उदार माऊली प्रशांतिसौख्यसाऊली
जया नरासि फावली तयास सिद्धि गावली।
'गुरू गुरू गुरू गुरू' म्हणोनि जो स्मरे नरू
तरोनि मोहसागरू सुखी घडे निरंतरू ॥३॥

गुरू चिदब्धिचंद्र हा महत्पदीं महेंद्र हा।
गुरू प्रतापरुद्र हा गुरू कृपासमुद्र हा।
गुरू स्वरूप दे स्वतां गुरूचि ब्रह्म सर्वथा
गुरुविना महाव्यथा नसे जनीं निवारिता ॥४॥

शिवाहुनी गुरू असे अधीक हें मला दिसे
नरांसि मोक्ष द्यावया गुरुस्वरूप घेतसे।
शिवें स्वरूप आपुलें न मोक्षदक्ष देखिलें,
गुरुत्व पूर्ण घेतलें, म्हणोनि कृत्य साधिलें ॥५॥

गुरूचि बाप माउली गुरूचि दीनसाऊली
गुरूचि शिष्यवासुरांसि कामधेनु गाऊली।
गुरूचि चिंतितार्थ दे गुरूचि तत्त्व तो वदे
अलभ्य मोक्षलाभ आपुल्या कृपें गुरूचि दे ॥६॥

गुरूचि भेद नाशितो जडांधकार शोषितो
गुरूचि मोह वारितो अविद्यभाव सारितो।
गुरूचि वहा दावितो गुरूचि ध्यान लावितो
गुरूचि विश्व सर्व आत्मरूप हें बुझावितो ॥७॥

गुरूचि मूळदीप रे जगत् गुरुस्वरूप रे
समस्त देवही तदंश दीसताति साजिरे॥
गुरूचि पूर्णसिंधु रे तयांत देव बिंदु रे
गुरु स्वयंभु सूर्य अन्य सर्वही मयूख रे ॥८॥

गुरूचि दिव्य दृष्टि रे गुरूचि सर्व शोध रे।
गुणांत तोचि विस्तरे मनांत तोचि संचरे
समस्त भूतमात्र चेष्टवोनि एकला उरे ॥९॥

गुरू विराटरूप रे गुरू हिरण्यगर्भ रे
गुरूचि ॐ त्रिवर्ण पंचवर्ण मुख्य तार रे।
गुरूचि विश्व तैजसू गुरूचि प्राज्ञ पूरुषू
गुरूविना दुजा नसे श्रुतीस घोष सर्वसु ॥१०॥

गुरूचि ध्येय ध्यान रे गुरूचि सर्व मान रे
नसे गुरूसमान रे जनीं गुरूस मान रे।
गुरूचि थोर रे महासुखा निधान रे
गुरू गुरू गुरू गुरू करीं म्हणोनि गान रे ॥११॥

गुरुस्वरूप चिंतिजे समाधि हेचि बोलिजे
समस्त वेदपाठनाममंत्र जाप्य जाणिजे।
यथार्थ सर्वतीर्थ सद्गुरूपदाब्जतोय हें।
गुरूचि सेवणें अनेक अश्वमेधयज्ञ हें ॥१२॥

नमो गुरू कृपाकरा नमो गुरू गुणाकरा
नमो गुरू परात्परा नमो गुरू महत्तरा।
नमो गुरू सनातना नमो गुरू मनोन्मना
नमो गुरू घनाघना नमो गुरू निरंजना ॥१३॥

**निरंजनमाधव**

## साई दर्शन

तिन्ही रुपी पाहुनी तुज मी
धन्य धन्य झाले ।
श्री गजाजन, स्वामी दिगंबर
साईरुपी पाहीले ।
आज मी धन्य धन्य झाले ॥

जसे दिसावे साई शिरडी
श्री गजानन तसे शेगावी ।
स्वामी दिगंबर अक्कलकोटी
आज येथे पाहिले ।
आज मी धन्य धन्य झाले ॥

कधी नसे ती चिंता मनी मज
साई नीवारी माझे संकट ।
तुला पाहता ध्यानी स्वप्नी
एकरूप जाहले ।
आज मी धन्य धन्य झाले ॥

चिंतन करीता तुझे निरंतर
येशी धावुनी प्रभू तू सत्वर ।
छबी पाहुनी आशिषाची
मंत्र मुग्ध झाले
आज मी धन्य धन्य झाले ॥

श्री गजानन जय गजानन
गणगणगणात बोले ।
जय श्री साई ओम श्री साई
साई चरण पाहताची हे मी
आनंदीत झाले ।
आज मी धन्य धन्य झाले ॥
अशी असू दे कृपा मजवर
दे तव चरणी मजला आश्रय ।
चरण स्पर्श होताची तुझा मज
अश्रू मी ढाळले ।
आज मी धन्य धन्य झाले ॥

**सौ. वंदना श्री. नलावडे**

## गुरुमाय साई

मज भेटूनी जा हो सद्‌गुरु नाथा ॥धृ॥
लेकरू तुझे मी तू माझी गुरुमाय
मी चुकलो काही म्हणूनी तू रुसलीस काय?
घडली नच पुजा
अंतरले तव पाय
करी कृपा मजवरी हाती धरूनी हनुमंता ॥१॥
तव चरणाचे अर्चन घडले नाही
जप करताना मन चंचल होते पाही
मी वाहत चाललो भवसागर जल डोही
मी संकटी पडलो धावत ये गुरुनाथा ॥२॥
अती कठीण वाटे भवसागर तराया
भक्ती करु जाता आडविते ही माया
चळते ही बुद्धी शिणली ही नाम काया
मज पदरी घेवूनी तारुनी ने साईनाथ ॥३॥
गुरुनाथ पताका घेईन मी स्कधी
मन तारुण नेईल नामाची ही धुंदी
मी सर्वस्वा सोडुन तन मन करी आनंदी
मम देह पडावा तव गुणगांता गाता ॥४॥
मज भेटूनी जा हो साई सद्‌गुरू नाथ

**के. पी. पहाडे,** नागपूर

## "ॐ साई श्री साई जय जय साई"

शिर्डीला जाऊ या। साई दर्शन घेऊ या।
साईस शरण येऊ या। साई नाम घेऊ या।
आनंदाने गाऊ या। ॐ साई श्री साई जय जय साई॥१॥
समाधीचे दर्शन घेऊ या। मस्तक चरणी ठेऊ या।
दुःख जातील पळूनी। पापे जातील जळूनी।
आनंदाने गाऊ या। ॐ साई श्री साई जय जय साई॥२॥
द्वारकामाई जाऊ या। साई स्मरण करू या।
उदी मस्तकी लावू या। साईचा आशिर्वाद घेवू या।
आनंदाने गाऊ या।ॐ साई श्री साई जय जय साई ॥३॥
**'गुरुस्थान' पाहू या। धुप-लोबान जाळू या।**
**निंबाची पाने चाखू या। गुरुचे दर्शन घेऊ या।**
**आनंदाने गाऊ या। ॐ साई श्री साई जय जय साई॥४॥**
खंडोबाचे देऊळ पाहू या। चावडीमध्ये जाऊ या।
लेंडी बागेत येऊ या। नंदादीप पाहू या।
आनंदाने गाऊ या। ॐ साई श्री साई जय जय साई॥५॥
निरोप घेता साईचा। दुःख होईल मनासी।
पुढील वर्षी येऊ या। साई दर्शन घेऊ या।
आनंदाने गाऊ या। ॐ साई श्री साई जय जय साई॥६॥

**अविनाश पाध्ये**



# गुरुपादुकाष्टक

ज्या संगतीनेंच विराग जाला । मनोदरींचा जडभास गेला ॥
साक्षात् परात्मा मज भेटवीला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥१॥
सद्योगपंथे धरि आणियेलें । अंगेंच मातें परब्रह्म केलें ॥
प्रचंड तो बोधरवी उदेला । विसरूं कसा मी गुरुपादुकाला ॥२॥
चराचरीं व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची ॥
परंपदीं संगम पूर्ण जाला । विसरूं कसा मी गुरुपादुकाला ॥३॥
जो सर्वदा गुप्त जनांत वागे । प्रपन्न भक्ता निजबोध सांगे ॥
सद्भक्तिभावाकरिता भुकेला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥४॥
अनंत माझ्या अपराधकोटी । नाणी मनीं घालुनि सर्व पोटीं ॥
प्रबोध करिता श्रम फार जाला । विसरू कसा मी गुरूपादुकाला ॥५॥
काही मला सेवनही न झाले । तथापि तेणें मज उद्धरीलें ॥
आतां तरी अर्पिन प्राण त्याला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥६॥
माझा अहंभाव वसे शरीरीं । तथापि तो सद्गुरु अंगिकारी ॥
नाहीं मनीं अल्पविकार ज्याला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥७॥
आतां कसा हा उपकार फेडूं । हा देह ओवाळुनि दूर सांडू ॥
ज्या एकभावे प्रणिपात केला । विसरू कसा मी गुरुपादुकांला ॥८॥
जया वानितां वानितां वेदवाणी । म्हणे 'नेति नेती' ति लाजे दुरूनी ॥
नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥९॥
जो साधुचा अंकित जीव जाला । त्याचा असे भार निरंजनाला ।
नारायणाचा श्रम दूर केला । विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥१०॥

# गुरुविन अनुभव कैसा कळे

चंद्रकांत गरगटे

गुरु म्हणजे आत्मज्ञानप्रकाशाने शिष्याचे जीवन उजळून टाकणारा कृपावंत. सद्गुरुंचा महिमा अचिंत्य, अगम्य व अगाध आहे गुरू माऊली आहे. गुरू पिता आहे, गुरू जीवनतारक व अज्ञानहारी आहे. असा गुरू भेटणे हे परमभाग्यच असते.

म्हणूनच संत ज्ञानदेवासारखा प्रज्ञावंतसुद्धा म्हणतो - "गुरुविन अनुभव कैसा कळे।"

विश्व प्रकाशकं ब्रह्म, ब्रह्म प्रकाशको गुरुः।
गुरू देवात्परो नास्ति तस्मात् सद्गुरवे नमः॥

वरील उक्तीप्रमाणे ब्रह्म हे संपूर्ण विश्वाला प्रकाशित करते आणि त्या अव्यक्त ब्रह्माला प्रत्यक्ष गुरुदेव साक्षात्काराद्वारे प्रकाशित करतात. यावरून सद्गुरुंचे माहात्म्य परब्रह्मापेक्षाही फार मोठे आहे. गुरुदेवापेक्षा श्रेष्ठ देव त्रैलोक्यात दुसरा कोणताच मिळणे शक्य नाही. केवळ सद्गुरु हेच आत्मब्रह्मप्रकाशक आहेत. म्हणून त्या राजाधिराज योगिराज परब्रह्म अनंतकोटी ब्रह्मांडनायक सद्गुरु श्री साईबाबांना माझे अनन्यभावे अखंड नमन आहे.

गुरुपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही दुसरे नाव आहे. आषाढ महिन्यात साजरी केली जाणारी जी ही गुरुपौर्णिमा आहे ती महाभारत, वेद व पुराणे यांचा जन्म ज्यांच्यापासून झाला त्या व्यासमुनींच्या स्मृतीप्रित्यर्थ साजरी करण्याची प्रथा आहे.

म्हणूनच व्यासांच्या बाबतीत असे म्हटले जाते -

"नमोस्तु ते व्यास विशाल बुद्धे
फुल्लार विंदायत पत्र नेत्र।
येन त्वया भारत तैल पूर्णः
प्रज्वलितो ज्ञानमय प्रदीपः।"

असे म्हणून व्यासांना वंदन करण्याची प्रथा आहे. या श्लोकाचा अर्थ असा की फुललेल्या कमळासारखे ज्यांचे आकर्षक नेत्र आहेत, ज्यांची बुद्धी विशाल आहे, अशा हे व्यासमुने, तुम्ही भारतरूपी तेलाने भरलेला ज्ञानदीप प्रज्वलित केलात त्या तुम्हालाही माझा नमस्कार असो.

'गुरु' या शब्दाची व्याख्याच अशी आहे की 'गु' - म्हणजे अंधःकार आणि 'रु' - म्हणजे प्रकाश. अर्थात, जो आत्मज्ञानप्रकाशाने स्वशिष्यामधील - अज्ञानांधकार तत्काल नष्ट करतो तो गुरु सर्व स्वानुभवी साधुसंत तसेच भक्तयोग्यांनीसुद्धा सद्गुरुबद्दल - "गुरु प्रत्यक्ष ब्रह्मा-विष्णू-महेशरूप आहे" - "गुरू साक्षात परब्रह्म परमेश्वर आहे" असे धन्योद्गार काढलेले आहेत.

सारांश, सद्गुरुंचा महिमा अचिंत्य, अगम्य व अगाध आहे. सद्गुरु हे कृपासिंधु आहेत.

सद्गुरु रामदास स्वामी - "जय जय रघुवीर समर्थ" असा जयघोष करून जेव्हा छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्यापुढं येऊन उभे राहिले तेव्हा त्या महान थोर शिष्याने ताबडतोब एका कागदावर स्वतःच्या सही-शिक्क्यानिशी "हे संपूर्ण राज्य श्री सद्गुरुचरणी अर्पण केले आहे", असं लिहून तो सरकारी कागद समर्थांच्या झोळीत दोन्ही हातानी प्रेमादरपूर्वक अर्पण केला व साष्टांग वंदन करून छत्रपती श्री शिवाजी महाराज समर्थांच्या समोर हात जोडून उभे राहिले. समर्थांनी तो कागद उलगडून वाचला व किंचित स्मितहास्य करून परम धन्यतापूर्वक समर्थ म्हणाले, "शिवबा! तू धन्य आहेस. तू खरोखरीच त्यागमूर्ती श्री शिवाचा अंश आहेस. पण बाबा, हा कागद घेऊन आम्ही करणार तरी काय! त्यापेक्षा एक मूठभर तांदूळ घातले असतेस तर पोटाची भूक तरी शमली असती." असे सहज म्हणून - "आता हे राज्य श्री समर्थ रामरायाचे समजून तू ते यापुढे प्रतिनिधीरूपाने चालव", असा दिव्य आदेश देऊन तो कागद समर्थांनी परत शिवरायांच्या स्वाधीन केला. धन्य आहे तो महात्यागी शिष्य

व धन्य आहेत ते परमथोर सद्‌गुरु. अशांचा सदैव सर्वत्र जयजयकार असो.

सद्‌गुरूंचा कळीकाळालाही भयंकर धाक आहे. सर्वसमर्थ सद्‌गुरुंच्या शिष्याकडे वक्रदृष्टीने पाहण्यास संपूर्ण भूमंडळात कोणीच समर्थ नाही.

समर्थ रामदास स्वामी गावोगावी संचार करीत असताना त्यांना एक दांपत्य भेटले आणि त्यांनी आपला मुलगा समर्थांच्या चरणी वाहिला. या मुलाचे नाव होते मधुकर.

एके दिवशी हिंडता हिंडता समर्थ व मधुकर एका खेडेगावात आले. त्या गावात कुणाचीच ओळख नव्हती. शेवटी त्यांनी मारुतीरायाचे मंदिर गाठले. राहण्यासाठी जागा साफसूफ करून घेतली आणि समर्थ आपल्या आसनावर बसले. दुपारची वेळ झालेली होती. तेव्हा समर्थांनी मधुकराला त्या गावातून माधुकरी मागून आणावयास सांगितले. मधुकराने लगेचच झोळी घेतली व तो माधुकरीसाठी गेला. गावाच्या चावडीजवळून जात असताना मधुकराला त्या गावातील चावडीबहाद्दरांनी पाहिले आणि जवळ बोलावून तू कोण? कोठून आलास? वगैरे प्रश्न विचारले मधुकराने त्या प्रश्नांची उत्तरे धिटाईने दिली. एवढ्यात एक गृहस्थ म्हणाले, "मधुकरा, तुला आम्ही माधुकरी घातली असती, पण तू फारच उशिरा आलास बघ. आम्हा सर्वांची जेवणे झाली आहेत." तेव्हा दुसऱ्या एका गृहस्थाने सांगितले की मधुकरा, आमच्या गावात उशिरा जेवणारे एकच गृहस्थ आहेत आणि ते म्हणजे आमचे जोशीबुवा. मोठे धनिक आणि उदार आहेत. तिथे तू गेलास तर तुला दहा घरची भिक्षा एकाच घरी मिळेल. तेव्हा तू तिथे जा.

हे ऐकून मधुकराला अत्यंत आनंद झाला. आधीच बरेच अंतर चालून आल्यामुळे त्याचे पाय दुखायला लागले होते. तेव्हा आता माधुकरीला दुसरीकडे हिंडत बसायला नको, असा विचार करून मधुकराने जोशीबुवांचे घर गाठले. अंगणात उभे राहून त्याने "समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे। जयाची लीला वर्णिती लोक तिन्ही। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥" हा श्लोक म्हणून 'जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना केली. जोशीबुवा बाहेर आले. त्यांनी त्या मुलाकडे एकवार नजर टाकली आणि काय उर्मट मुलगा आहे हो हा! असे पुटपुटत मधुकराजवळ येऊन त्यांनी त्याला विचारले, "मुला, तू फार शहाणा दिसतोस. तू आत्ता कुठला श्लोक म्हणालास?" मधुकराला त्यांच्या बोलण्यातली खोच समजली नाही. त्याने तो श्लोक पुन्हा म्हणून दाखविला. शास्त्रीबुवा म्हणाले, "मुला, तुला या श्लोकाचा अर्थ तरी समजतो का?" मधुकराने उत्तर दिले, "महाराज, यात अर्थ न समजण्यासारखे काहीच नाही. अगदी सरळ अर्थ आहे. समर्थांच्या सेवकांकडे वाकड्या दृष्टीने पाहण्याची या सर्व भूमंडळाच्या ठिकाणी कुणाचीही प्राज्ञा नाही आणि ज्याच्या लीलांचे वर्णन अखिल त्रैलोक्य करते, तो माझा राम दासाबद्दल अभिमान धारण करणारा असून दासाची कधीच उपेक्षा करीत नाही." जोशीबुवांचा पारा चढला. "आपल्या सेवकाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाचीही प्राज्ञा नाही, अशी घमेंड मारणारा कोण आहे, हे मला एकदा पाहिलेच पाहिजे! पण थांब जरा, आत ये!" असे म्हणून जोशीबुवांनी मधुकराला ओसरीवर नेले. त्याची जन्मवेळ टिपून घेतली, पत्रिका तयार केली आणि त्यांनी त्याला सांगितले, "मुला, उद्या -माध्यान्हीला तुझा मृत्यू आहे उद्या तू मरणार आहेस. तेव्हा मृत्यूच्या तावडीतून जर तुझ्या समर्थाने तुला सोडविले तर परवाच्या दिवशी तू माधुकरीला ये. मी माधुकरी घालीन"

हे ऐकल्याबरोबर आधीच थकलेला मधुकर गलीतगात्र झाला. त्याचे पाय लटपटू लागले. त्याने कशीबशी दोन-चार घरे हिंडून माधुकरी आणली आणि समर्थांपुढे ठेवली.

समर्थांनी मधुकराला जवळ बोलविले आणि म्हणाले, "मधुकरा, फारच थकलेला दिसत आहेस, बैस." असे म्हणून त्याच्या पाठीवरून हात फिरविल्याबरोबर मधुकर ओक्साबोक्शी

सदुरुनायके पूर्ण कृपा केली। निजेवस्तु दाविली माझी मज ॥१॥
माझें सुख मज दावियेलें डोळां। दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ॥ध्रु॥
तया उतराई व्हावें कवण्या गुणें। जन्मा नाहीं येणें ऐसें केलें ॥२॥
डोळियाचा डोळा उघडिला जेणें। लेवविलें लेणें आनंदाचें ॥३॥
नामा म्हणे निकी सांपडली सोय। न विसंबे पाय खेचराचे ॥४॥

रडू लागला. समर्थ म्हणाले, "मधुकरा, तुला काय झाले ते सांग तरी? तुला कोणी मारले का? कुणी बोलले का?"

मधुकर म्हणाला, "महाराज, मारले असते तरी पत्करले असते, पण मला माझ्या मरणाची भीती वाटत आहे. आज जोशीबुवांनी माझे भविष्य वर्तविले आणि उद्या दुपारी माध्यान्हीला तू नक्की मरणार आहेस, असे सांगितल्यापासून माझ्या मनाला धसका बसला आहे. महाराज, मरणापूर्वी आईबाप तरी भेटावेत, अशी माझी इच्छा आहे. पण ते कसे जमणार? आमच्या गावचा प्रवास म्हणजे चार दिवस तरी लागणार! आता काय करूरू? महाराज, पहा मला थंडी वाजू लागली आहे. अंग कढत झाल्यासारखे वाटत आहे." समर्थांनी मधुकराच्या अंगाला हात लावला तेव्हा त्यांना चटकाच बसला. समर्थांनी मधुकराची शय्या घातली. मधुकराला त्या शय्येवर झोपवले आणि ज्यांच्या चरणरजाने अखिल पृथ्वी पुनीत व्हावी अशा समर्थांनी मधुकराचे पाय चेपायला सुरुवात केली. मधुकराचा ताप वाढत होता. थोड्याच वेळात मधुकराचा मनावरचा ताबा उडू लागला. तो बेशुद्ध झाला आणि त्यातच त्याची बडबड सुरू झाली. आई... बाबा... तुम्ही मला कसे हो भेटणार? मी जाणार...मी देवाघरी जाणार...मला बोलावणे आले आहे...आई, तू का रडतेस? बाबा, तुम्ही का रडता? माझ्या समर्थांनी नाही मला मारले...ते फार चांगले आहेत. आई, तू इथे नाहीस म्हणून त्यांनीच माझे अंथरूण घातले. त्यांनीच माझे पाय चेपले...आई, त्यांना तू बोलू नको...ते पहा...ते पहा यमाचे दूत आले...नाही...मी येणार नाही असे म्हणत तो दचकून उठत असे. डोके उघडून पाही. तो समर्थांची प्रेममयी मूर्ती समोर दिसे. सर्व रात्र निघून गेली. शनिवार उजाडला. समर्थांनी पाणी तापविले आणि समर्थ त्याला म्हणाले, "मधुकर, आज शनिवार आहे. आज स्नान करायला पाहिजे." मधुकर म्हणाला, "महाराज, माझ्या अंगात बसायचीसुद्धा ताकद नाही, स्नान कसे करू? आणि त्यातून मी जाणार! मरणार!"

समर्थ म्हणाले, "मरायचं आहे तर पारोशाने कशाला मरतोस? आंघोळ करून तरी मर! तुझ्या अंगात शक्ती नाही, तर मी तुला मांडीवर घेऊन स्नान घालतो, मग तर झाले!" असे म्हणून समर्थांनी मधुकराला उचलून एका सपाट धोंड्यावर बसविले, तेव्हा त्याचे सर्व शरीर लटपटत आहे, असे पाहून त्यांनी मधुकराला आपल्या मांडीवर बसविले आणि स्नान घालायला सुरुवात केली. ज्या समर्थांच्या चरणाच्या तीर्थाने अखिल ब्रह्मांडाची दु:खे दूर होतात, त्या समर्थांनी मधुकराच्या अंगावरून पडणारे तीर्थ आपल्या अंगावर घेतले. ही खरी शिष्यप्रीति! उभयतांच्या आंघोळी झाल्यानंतर समर्थांनी खिचडी तयार केली आणि मधुकराला जेवायला बोलाविले. तो म्हणाला, "महाराज, मला मरायला आता घटका दोन घटकांचाच अवधि राहिलेला आहे आता जेवायचे तरी कशाला?" समर्थ म्हणाले, "मरायचे तर आहेच, मग उपाशी पोटाने कशाला मरतोस? भरपूर खा आणि मग मर!" मधुकर अंथरूणावर बसला आणि त्याने दोन घास खाल्ले. समर्थांचे भोजन झाले. येथपर्यंत माध्यान्हीचा सुमार झाला. समर्थ मधुकराजवळ आले आणि मधुकराला, म्हणाले, "मधुकरा, काल रात्री तुझ्या बडबडीमुळे मला झोपच आली नाही. तेव्हा आता मी जरा पडतो."

मधुकर म्हणाला, "महाराज, आता एकदा माझा देह पडला म्हणजे मग पडा." समर्थ म्हणाले, "ते काही नाही. मी थोडा वेळ झोप घेणार आहे. तू जरा माझे पाय चेपीत बैस आणि कुणीही तुला बोलाविले तरी माझ्या अंगावरची घोंगडी सोडून जाऊ नकोस." असे सांगून समर्थ घोरू लागले मधुकर पाय चेपीत होता. एवढ्यात आठ-दहा काळेभिन्न पुरुष दरवाजापाशी आले. त्यांनी मधुकराला बाहेर बोलाविले. मधुकर म्हणाला, "मी माझ्या गुरुमाऊलीची सेवा करीत आहे. मी उठणार नाही." दूत खवळले आणि त्याला म्हणाले, "बऱ्या बोलाने आलास तर ठीक आहे. नाही तर खेचून आणू!"

एवढे ऐकून मधुकर म्हणाला, "इतक्या दमदाटीने काम होणार नाही. असा दम द्यायला तुम्ही कोण एवढे लागून गेला आहात?" दूत म्हणाले, "आमचा प्रताप तुला माहीत नाही असे दिसते. आम्ही यमाचे दूत आहोत. आमची आज्ञा आहे, ताबडतोब बाहेर ये." मधुकराला समर्थांचा आधार होता. त्याने ताडकन् उत्तर दिले, "तुम्ही काय वाट्टेल ते करा. मी बाहेर येणार नाही. तुम्हीच काय पण तुमचा मालक साक्षात् यम जरी इथे आला तरीसुद्धा मी जागचा हलणार नाही." हे ऐकून दूतांनी पाश टाकले. पण आश्चर्य असे की दूतांचे पाश जेमतेम घोंगडीपर्यंत येत असत आणि तेथूनच परत फिरत. शेवटी यमदूत आपापसात म्हणाले की या गुरुभक्ताला येथून न्यावयाचे काम महाकठीण आहे. या मुलापुढे आपले सामर्थ्य काही चालत नाही. तेव्हा हे वृत्त स्वत: यमराजांनाच सांगावे, असे म्हणून यमदूत दिनघून गेले. मधुकराला वाटले, बहुतेक या घोंगडीत काहीतरी जादू भरली आहे. म्हणून त्याने बहुतेक

सर्व घोंगडी आपल्याभोवती लपेटून घेतली आणि थोडेस टोक समर्थांच्या अंगावर ठेवले काही वेळाने एक भव्य आकृती दाराजवळ दिसली बरोबर रेडा आहे, हातात पाश आहेत, अशा थाटात यमाची स्वारी दाराशी आली आणि आपल्या करड्या आवाजात त्याने मधुकराला हाक मारली मधुकराने उत्तर दिले, "तुम्हाला मी छपन्न वेळा सांगितले की मी येथून हलणार नाही, मी बाहेर येणार नाही तरी तुम्ही मला पुन्हा पुन्हा बाहेर यायला सांगता! तुम्हाला काहीच कसे वाटत नाही" यम म्हणाला, "पोरा, नीट विचार करून बोल मघाशी आले होते ते माझे दूत होते आता मी प्रत्यक्ष यम तुझ्यासमोर आलो आहे मुकाट्याने बाहेर ये." मधुकर म्हणाला, "प्रथम दूताकडून काम होईना म्हणून जरी तुम्ही इथे आला असलात तरी लक्षात ठेवा, तुम्हीच नव्हे, तर साक्षात तुमचा बाप जरी मला बाहेर बोलावू लागला तरी मी बाहेर येणार नाही" हे उत्तर ऐकून यम संतापला त्याने आपले पाश टाकले, पण पूर्वीप्रमाणेच पाश घोंगडीपर्यंत येऊन पुन्हा परत गेले पाशांचे सामर्थ्य चालत नाही आणि आपल्या स्वतःला आत जाऊन मधुकराचे प्राण घेता येत नाहीत असे पाहून हातपाय आपटीत यम निघून गेला थोड्या वेळाने समर्थ उठले आणि त्यांनी मधुकराला विचारले, "काय मधुकरा! तू अजुनी इथेच आहेस! मला काही भलतेच वाटले!" मधुकराने सर्व हकीकत निवेदन आणि तो म्हणाला, "महाराज, या घोंगडीने आज मला वाचवले आहे."

समर्थ म्हणाले, "काही हरकत नाही आता ज्या जोशीबुवांनी तुझा मरणकाळ तुला सांगितला होता त्यांच्या घरी जाऊन माधुकरी आण" मधुकर म्हणाला, "मी जाईन, वाटेत पुन्हा यमदूत उपटले, तर काय करू?" समर्थ म्हणाले, "अरे, तुझ्या मरणाची वेळ आता टळली आहे आता कशाला काळजी करतोस?" मधुकर म्हणाला, "मी जातो पण ती घोंगडी मजजवळ द्या." दुसऱ्या दिवशी समर्थांनी मधुकराच्या समाधानासाठी त्याला घोंगडी दिली आणि मधुकर जोशीबुवांच्या घरी माधुकरी मागायला गेला. पुन्हा पूर्वीचा श्लोक ऐकल्याबरोबर जोशीबुवा बाहेर आले आणि म्हणाले, "काय रे, तू अजून इथेच आहेस वाटते?" मधुकर म्हणाला, "होय महाराज, आपल्या आशीर्वादेकरून मी अद्याप इथेच आहे." जोशीबुवांनी पुन्हा गणित मांडले त्याचा मरणकाळ अगदी बिनचूक होता असे कसे घडले? तेव्हा मधुकराने सर्व हकीकत सांगितल्यावर जोशीबुवा म्हणाले, "एकूण तुझा समर्थ बराच बलवान दिसला हे एकदा दर्शनाला आलेच पाहिजे." मधुकर म्हणाला, "एकदा का, आत्ता चला की!" असे म्हणून त्याने जोशीबुवांना मारुतीच्या देवळात आणले मधुकर म्हणाला, "महाराज, बरं का, ज्यांनी मला माझी मरणाची घटका बरोबर सांगितली, ते हे जोशीबुवा आपल्या दर्शनाला आले आहत" शास्त्रीबुवांनी समर्थांना नमस्कार केला समर्थ म्हणाले, "या शास्त्रीबुवा, काय उद्योगधंदा चालू आहे?" जोशीबुवा म्हणाले, "महाराज, ज्योतिष बघतो हा माझा धंदा नाही" त्यावर समर्थ म्हणाले, लोकांचे मरणकाळ बघायचे, ते सांगायचे आणि त्यांच्या दुःखावर आपण आनंद मानायचा, हाच ज्योतिषशास्त्राचा हेतू आहे वाटते? लोकांनी आपले आयुष्य किती उरले आहे, हे समजावे, निरवानिव करायला सवड सापडावी आणि उर्वरित आयुष्य भगवत्सेवेकला घालविता यावे, म्हणून योग्य रीतीने भविष्य सांगायचे, हे सोडून जो येईल त्याला त्याचा मरणकाळ आणि तोही अगदी बिनचूक सांगायचा, यासारखा मूर्खपणा नाही शास्त्रीबुवा, शास्त्राबद्दल आणि तुमच्याबद्दल योग्य आदर ठेवून मी तुम्हाला सांगतो की हे नसते धंदे करण्यापेक्षा तुम्ही केवळ रामनामाचा जप केलात तर तुम्ही मोठी पदवी मिळवाल, श्रेष्ठ व्हाल."

समर्थांचे उपदेशपर शब्द ऐकून शास्त्रीबुवांना पश्चाताप झाला आणि पुन्हा असे कृत्य करणार नाही, अशी त्यांनी

> सद्गुरूचे पाय जीवें न विसंबावे । मन वळवावें वृत्तिसहित ॥१॥
> डोळियाचे डोळे उघडिले जेणें । आनंदाचे लेणें ल्लेवविलें ॥धृ॥
> जन्म-मरणाचे फेडिले सांकडें । कैवल्याचि पुढें दारवविले ॥२॥
> मोहरले तरु पुष्प-फळभारें । तेचि निर्विकार सनकादिक ॥३॥
> नामा म्हणे स्वामी खेचरं माऊली । कृपेची साऊली केली मजा ॥४॥



शपथ घेतली.रामरायाचा जयजयकार झाला आणि मधुकराने पुन्हा श्लोक म्हणायला सुरूवात केली.. "समर्थाचिया सेवका वक्र पाहे. .

थोडक्यात सांगायचे तर - सद्गुरुमहिमा अगाध व अलौकिक आहे.प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण, प्रभु श्री रामचंद्र व इतर मोठमोठ्या देवांनादेखील सद्गुरुंना शरण जावे लागले. मग सामान्य मानवाची काय कथा ! यावरून सद्गुरुचे माहात्म्य केवढे असामान्य व थोर आहे आणि सद्गुरुकृपेची किती आवश्यकता आहे, हे सिद्ध होते.

या जगामध्ये सामान्य गुरु मानवी आयुष्यात शेकडो भेटतात, परंतु 'अ-क्षर' बोध, म्हणजे ब्रह्मबोध करवून देणारा 'सद्गुरु' मात्र एकच असू शकतो. तोच, केवळ आत्मसाक्षात्काराचा स्वानुभविक मार्ग प्रत्यक्ष दाखवून शिष्याला तात्काळ स्वात्मतुल्य बनवू शकतो.

म्हणूनच आपण सर्व साईभक्तांनी आपल्या सद्गुरु साईबाबांनी जो गुरुमंत्र दिला आहे त्याचे सतत मनन, चिंतन, आकलन करून तो प्रत्यक्ष आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प केला पाहिजे.त्यांचा मंत्र म्हणजे - 'श्रद्धा व सबुरी.' आपण कोणतेही कार्य करताना त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे, निष्ठा ठेवली पाहिजे व ते कार्य करताना घाई करता कामा नये, धीर धरायला हवा.आपल्याला त्या कार्याचे फळ मिळाल्याशिवाय रहात नाही पण त्याकरिता आपण सद्गुरुंच्या ठिकाणी दृढ श्रद्धा ठेवली पाहिजे.

म्हणून ज्ञानेश्वर माऊली म्हणतात -

**"भावेविण देव न कळे निःसंदेह।**
**गुरुविन अनुभव कैसा मिळे ॥**

तर संत तुकाराम महाराज म्हणतात -


**"सद्गुरुवांचूनी सांपडेना सोय।**
**धरावे ते पाय आधी आधी ॥"**

साईसद्गुरुंचे श्रद्धा-भक्तीने व प्रेमभावनेने पूजन-अर्चन करून आपण आपली भक्ती प्रगट करू या आणि आपली श्रद्धारूपी सुमने वाहून स्वाद-मधुर भावभक्तीचा नैवेद्य दाखवून श्रद्धारूपी गुरुदक्षिणा त्यांच्या चरणी अर्पण करू या साईबाबा आपल्या भक्तांवर कृपाहस्त ठेवण्यास सदैव तत्पर असतातच. ते आपल्या सर्व साईभक्तजनांवर चिरंतन कृपाहस्त ठेवून सर्वांना कृतार्थ करतीलच यामध्ये तिळमात्र संशय नाही.

**नामस्मरण ज्याच्यामुखी**
**साईकृपे तोच एक सुखी।**
**एकच देव, एकच गुरु, एकच साधन**
**यांवर ठेवता विश्वास**
**कृपा करील साईश्वर खास॥**

ॐ ॐ ॐ

# गुरु परंपरा



म्हणती श्रीगुरू तोचि जगद्गुरु । त्यातें झाला आणिक
गुरु । त्रयमूर्तीचा अवतारु । कवणेपरी दिसतसे ॥१०१॥
सिद्ध म्हणे शिष्यासी । सांगेन याची स्थिति कैसी ।
पूर्वी श्रीरघुनाथासी । झाला वसिष्ठ केवीं गुरु ॥१०२॥
आठवा अवतार श्रीकृष्णदेवासी । सांदीपनी जाहला गुरु कैसी।
अवतार होतांचि मानुषीं तयापरी रहाटावें ॥१०३॥
याकारणें श्रीगुरुमूर्ती । गुरु केला तो कृष्णसरस्वती।
बहुकाळींचा होता यति । म्हणोनि त्यानें मानिलें ॥१०४॥
शिष्य म्हणे सिद्धासी । स्वामी कथा निरोपिलीसी ।
वृद्ध कृष्णसारस्वतीसी । गुरु केलें म्हणोनियां ॥१०५॥
समस्त यतीश्वरांहून । तयासि दिधला बहुमान ।
कृष्णसरस्वती तो पूर्वी कोण। कोण गुरुचें मूळपीठ ॥ १०६॥
विस्तारूनि आम्हांसी । निरोपावें कृपेसीं ।
त्याणें माझे मानसीं। संतोष होईल स्वामिया ॥१०७॥

ऐसें शिष्य विनविता । तंव सांगे विस्तारता ।
मूळपीठ आद्यंता । गुरुसंतति परियेसा ॥१०८॥
आदिपीठ 'शंकर' गुरु । तदनंतर 'विष्णु' गुरु ।
त्यानंतर 'चतुर्वक्त्र ' गुरु । हें मूळपीठ अवधारीं ॥१०९॥
तदनंतर 'वसिष्ठ' गुरु । तेथोनि 'शक्ति,' 'पराशरु' ।
त्याचा शिष्य 'व्यास' थोरु। जो कां अवतार विष्णूचा ॥११०॥
तयापासूनि 'शुक' गुरु जाण । 'गौडपादाचार्य' सगुण ।
आचार्य गोविंद' तयाहून । पुढें आचार्य तो 'शंकर' जाहला॥१११॥
तदनंतर 'विश्वरूपाचार्य' । पुढें 'ज्ञानबोधीगिरिय' ।
त्याचा शिष्य 'सिंहगिरिय' । 'ईश्वरतीर्थ' पुढें झाले ॥११२॥
तदनंतर 'नृसिंहतीर्थ' । पुढे शिष्य 'विद्यातीर्थ ।
'शिवतीर्थ,' 'भारतीतीर्थ' । गुरुसंतति अवधारीं ॥११३॥
मग तयापासोनि । 'विद्यारण्य' श्रीपादमुनि ।
'विद्यातीर्थ म्हणोनि । पुढें झाला परियेसा ॥११४॥
त्याचा शिष्य 'मळियानंद' । 'देवतीर्थसरस्वती' वृंद ।
तेथोनि 'सरस्वतीयादवेंद्र' । गुरुपीठ येणेंपरी ॥११५॥
यादवेंद्र मुनीचा शिष्य । तोचि 'कृष्णसरस्वती' विशेष।
बहुकाळींचा संन्यासी । म्हणोनि विशेष मानिती ॥११६॥

येणेंपरी श्रीगुरुनाथ । आश्रम घेती चतुर्थ ।
संन्यासमार्गस्थापनार्थ । श्रीनृसिंहसरस्वती ॥११७॥
समस्त वेदांचा अर्थ । सांगता झाला श्रीगुरुनाथ ।
म्हणोनि वंदिती समस्त । तया काशी नगरांत ॥११८॥
ख्याति केली अतिगहनी । तया वाराणसीभुवनीं ।
यति समस्त येऊनि । सेवा करिती श्रीगुरूची ॥११९॥
मग निघाले तेथोनि । बहुत शिष्य-समवेत मुनि ।
उत्तरतीर्थ बदरीवनीं । अनंत तीर्थे पहावया ॥१२०॥
सव्य घालूनि मेरूसी । तीर्थे नवखंड क्षितीसी ।
सांगता विस्तार बहुवसी । ऐक शिष्या नामकरणी ॥१२१॥
समस्त तीर्थे अवलोकीत । सर्वे शिष्य-यतींसहित ।
भूमिप्रदक्षिणा करीत । आले गंगासागरासी ॥१२२॥
सिद्ध म्हणे नामांकिता । समस्त चरित्र सांगतां ।
विस्तार होईल बहु कथा । म्हणोनि तावन्मात्र सांगतों परियेसीं ॥१२३॥
समस्त महिमा सांगावयासी । शक्ति कैंची आम्हांसी ।
अनंत महिमा त्रैमूर्तीसी । गुरुचरित्र परियेसीं ॥१२४॥

(श्रीगुरुचरित्र १२ वा अध्याय)

पुण्यस्मरण

# रामभक्त गोस्वामी तुलसीदास



श्रावण शुद्ध सप्तमी (दि.२१ ऑगस्ट ९६) हा गोस्वामी तुलसीदास यांच्या जयंतीचा पुण्यस्मरण दिन. 'रामचरितमानस' या महाकाव्याच्या रूपाने गोस्वामीजी अमर झालेले आहेत. त्या महाकाव्याचे अवगाहन करून रामनामाच्या रंगात रंगून जाणे हेच गोस्वामीचे खरे पुण्यस्मरण होय.

प्रभू रामचंद्र व भगवान श्रीकृष्ण या दोन अवतारी महापुरुषांनी अवघ्या जनमनाला मोहीत केलेले असून थोर चिंतक, कवी, साहित्यिक, आदींनाही आकर्षित केलेले आहे. श्रीराम चरित्राचे गुणगान करणाऱ्या कविंची परंपरा फार मोठी आहे आदिकवी वाल्मीक ऋषी पासून प्रारंभ होणाऱ्या, या परंपरेत महर्षी व्यास, महाकवी कालिदास, भवभूती, क्षेमेन्द्र चंदबरदाई, गोनबुद्ध, शारलादास, संत एकनाथ, कवी मोरोपंत, रहिम खान, पद्माकर आणि गोस्वामी तुलसीदास हे काही अग्रही रामभक्त आहेत.

महाराष्ट्रात ज्ञानेश्वर-तुकारामाचे जे स्थान जनमानसात आहे. तसेच अढळस्थान उत्तरेत हिंदी भाषिकांमध्ये संतकवि गोस्वामी तुलसीदास यांचे आहे. ओव्या-अभंगांनी महाराष्ट्राची पहाट व सांज होते तशीच उत्तरेत गोस्वामी तुलसीदासाच्या चौपाई ने घराघरात मनामनात मानाचे स्थान प्राप्त केलेले आहे वाल्मिकी रामायणापेक्षाही गोस्वामी तुलसीदासाच्या 'रामचरितमानस' ची लोकप्रियता उत्तरेत अधिक दिसून येते. अर्थात जनमनाची भाषा हे त्याचे एक प्रमुख कारण आहे

गोस्वामी तुलसीदास यांचा जन्म उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यातील राजापूर येथे संवत १५५४ मध्ये श्रावण शुक्ल सप्तमी रोजी झाला. त्यांचे गुरू नरहरानंद यांचेकडून 'सूकरखेत' येथे गोस्वामी तुलसीदासांना श्रीरामकथेचा प्रथम परिचय झाला आणि ते त्या क्षणापासून रामभक्त झाले- रामसमर्पित झाले. त्यांच्या या अढळ निश्चल रामभक्तीला संवत १६३१ चैत्र शुद्ध नवमीच्या दिनी ऐन रामजन्माच्या मुहूर्तावर 'रामचरित्रमानस' महाकाव्याचे फळ प्राप्त झाले. रामजन्म स्थळी अयोध्यानगरी येथेच 'रामचरित्रमानस' काव्य प्रकट झाले हा एक विलक्षण योगायोग नव्हे तर गोस्वामींचा दैवयोग होता.

गोस्वामींनी अनेक प्रकारच्या साहित्यरचना केलेल्या आहेत पण रामभक्ती हाच त्या सर्व कलाकृतींचा केंद्रबिंदू - गाथा आहे. **रामचरितमानस**, **विनयपत्रिका**, **गीतावली**, **कवितावली**, **दोहावली**, या त्यांच्या सर्व रचना रामभक्तीरसाने ओतप्रोत भरलेल्या व भारलेल्या आहेत.

**स्वारथ साँय जीव कहुँ एहा ।**
**मन क्रम वचन राम पद नेहा ।**
**सोई पावन सोइ सुभग सरीरा ।**
**जो तनु पाइ भजिअ रघुबीरा ॥** (रामचरितमानस ७।९५:१)

गोस्वामी तुलसीदास वरील चौपाईत म्हणतात - "जीवात्म्याचा खरा स्वार्थ - परमार्थ तोच आहे की मानव शरीर प्राप्त झाल्यावर त्याने रामाचे भजन-स्मरण करून धन्य व्हावे." गोस्वामींचा हा संदेश आपण चिंतन करून रामभक्तीच्या महामार्गावर एक पाऊल टाकण्याचा गोस्वामींच्या जयंतीनिमित्ताने संकल्प करू या.

**(संकलन - लेखन : विद्याधर ताठे)**

## पुण्यस्मरण

# सावता म्हणे केला मळा

संत ज्ञानदेवाच्या प्रभावळीतील एक थोर संत म्हणजे अरण गावचे संत सावता माळी 'कांदा मुळा भाजी। अवधि विठाई माझी ॥' म्हणणारे सावतोबुवा प्रगाढ व्यवसाय निष्ठेचे मनोज्ञ दर्शन आहेत. उद्योग-व्यवसाय सोडून देव देव न करता आपला उद्योग हाच देव मानण्याची त्यांनी आपल्या कृतीने दिलेली शिकवण, work is worship या कल्पनेचाच मूलधार आहे आबाढ कृष्ण चतुर्दशी हा त्याचा पुण्यतिथी दिन.पुण्यतिथी निमित्ते सावतोबुवांचे पुण्यस्मरण आपणास प्रेरणादायी ठरो.

**कांदा मुळा भाजी। अवघी विठबाई माझी ॥**
**लसून मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी ॥**
**मोठ नाडा विहीर दोरी। अवघी व्यापिली पंढरी ॥**
**सावता म्हणे केला मळा। विठ्ठला पायी गोंविला गळा ॥**

संत सावता माळी यांची वरील अभंग रचना भक्त भाविकांमध्ये विशेष जनप्रिय ठरलेली आहे.आपला उद्योगधंदा सोडून देव देव न करता आपल्या प्राप्त कामातच देव कसा पहावा हे संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत सेना न्हावी या संतांनी आपल्या अभंगातून उत्तम प्रकारे प्रतिपादन केलेले आहे.याद्दष्टिने सावता माळीच्या वरील अभगाप्रमाणेच नरहरी सोनारांचा

'देवा तुझा मी सोनार।
तुझे नामाचा व्यवहार।
देह बागेसरी जाण।
अंतरात्मा नाम साने ॥

' हा अभग आणि सेना न्हावी याचा 'आम्ही वरीक वारी। करू हजामत वारीक। विवेक दर्पण आयना दावू।' अभंग जिज्ञासूंनी चिंतन करण्यासारखे आहेत.

पंढरीची यात्रा व अन्य देव देव करणारे लोक म्हणजे रिकामटेकडे, निरुद्योगी, फालतु वेळ घालविणारे, राष्ट्रीय श्रम शक्ती फुकट घालणारे आदी व्होलकर विशेषणांनी श्रद्धावान भाविक वारकऱ्यावर तथाकथित बुद्धिवादी टीकेची झोड उठवितात पण त्यानी वरील अभंग वाचण्याचे थोडसे कष्ट घेतले असते तरी त्यांना संताच्या ठायी वसत असलेली श्रमनिष्ठा व आपला उद्योगच देव मानून तो निष्ठेने करण्याचा भाव दिसून आला असता संताची उद्योगप्रवणता व उद्योगप्रियता त्यांना कळली असती.

संत ज्ञानदेवांच्या थोर कार्यामुळे समाजाच्या सर्व थरात जातीमध्ये संत निर्माण झाले जे विचार ज्ञानदेवांना मांडले ते त्यांनी त्यांच्या अल्पशा जीवनातच मूर्तस्वरूपात करून दाखविले. त्यांनी पारमार्थिक समतेचा केवळ विचार न मांडता आपला विचार विविध जाती पोटजातीत संत निर्माण करून कृतीत आणून दाखविला या दृष्टिने ज्ञानदेव हे कृतीशिल समाजसुधारकच होते त्यांच्या प्रभावळीमध्ये शिंपी समाजातील गोरोबा, महार समाजातील चोखा मेळा, कुंभार समाजातील नामदेव, सोनार समाजातील नरहरी, न्हावी समाजातील सेना, दासी जनाबाई, आदि संत होते ज्ञानेदवप्रणित संत मंडळीने केलेल्या कार्यात संत सावता माळीचाही याचाही वाटा मोठा आहे.

सावता माळी हे सोलापूर जिल्ह्यातील अरणभेंडी गावचे शेतकरी समाजातील माळी जातीच्या या संत महात्म्याची योग्यता ज्ञानदेव-नामदेव यांच्या एवढीच श्रेष्ठ होती इ स १२०५ ते १२९५ असा त्यांचा अवतार कार्य काळ मानला जातो.त्यांच्या नावावर सकलसंत गाथेमध्ये २३ अभंग आहेत त्या अभंगापैकी लेखाच्या प्रारंभीचा अभंग बहुतेकांना तोंडपाठ आहे.

**आमुची माळ्याची जात ।**
**शेत लावू बागाईत ॥**

असा आपल्या जातीचा व आपल्या व्यवसायाचा त्यांनी स्वाभिमानाने आपल्या अभंगातून उल्लेख केला असून

**शांति शेवती फुलली ।**
**प्रेम जाई जुई व्याली**

या त्यांच्या अभंगात फुलाच्या व्यवहाराचीच नव्हे तर त्याच्या गंधसुगंधाची असलेली त्यांची जवळीकता दिसून येते. विठ्ठलाच्या भक्तीभावाच्या सुगंधाने गंधीत झालेली सावता माळी यांची एकूण अभंग रचना संख्येने अल्प असली तरी भक्तीकाव्य म्हणून श्रेष्ठ दर्जाची आहे.

सावता माळी यांचे अत्यंत विश्वासू - पुराव्याधिष्ठीत असे चरित्र इतर संतांप्रमाणेच अनुपलब्ध आहे पण त्यांच्या पुढील दोन आख्यायिका त्यांच्या संतत्वाची थोरवी सांगणाऱ्या आहेत. : संत ज्ञानेदेव व संत नामदेव एकदा पंढरीनाथाचा शोध घेत घेत सावता माळ्याच्या मळ्यात आले त्या दोघाना आपला पत्ता लागू नये म्हणून देव सावतोबुवांना मला लपवून ठेवण्याची विनंती करतो. तेव्हा हातातील कोयत्याने सावतोबुवा आपल छाती फाडून आपल्या हृदयात देवास लपण्यासाठी स्थान देतात व खांद्यावरील घोंगडे छातीवर पांघरून नामस्मरण करीत ध्यानस्त बसतात. मागोमाग ज्ञानदेव नामदेव येतात पण त्यांना देवाचा ठाव लागत नाही याप्रसंगातू सावता माळ्याची योग्यता - विठ्ठलनिष्ठा आणि विठ्ठल भक्तीविषयीचा समर्पित भाव कळून येतो.

सावता माळ्याविषयी दुसरी एक आख्यायिका अशी सांगतात की त्यांची विठ्ठलाशी एव्हढी एकरूपता होती की ते पंढरीच्या वारीस येत नसत. खुद्द विठ्ठलच आपल्या भक्ताच्या भेटीसाठी अरणगावी जात असे. आजही इतक्या वर्षानंतर दरवर्षी श्री विठ्ठलाची पालखी सावता माळ्याच्या भेटीसाठी अरणगावी जाते. माझ्या माहिती नुसार पंढरीच्या श्री विठ्ठलाच्या पादुका पालखीतून केवळ दोन वेळाच मंदिराबाहेर जातात. एकदा संत ज्ञानदेव समाधी सोहळ्यासाठी आळंदीला आणि दुसऱ्यावेळी सावता माळी यांच्या भेटीस अरणगावला.

संत सावता माळी यांची पारमार्थिक योग्यता नेमकेपणाने कळण्यास त्यांचा पुढील अभंग पुरेसा आहे

**नामाचिया बळे न भीऊ सर्वथा ।**
**कळिकाळाच्या माथा सोटे मारू ॥१॥**
**वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी ।**
**विठ्ठल गाऊनी नाचो रंगी ॥२॥**
**सुखाचा सोहळा करूनी दिवाळी ।**
**प्रेमे वनमाळी चित्ती धरू ॥३॥**
**सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा ।**
**तेणे भक्तिद्वारा वोळगती ॥४॥**

वैकुंठीचा देव कीर्तनी आण्याचा त्यांचा दुर्दम्य विश्वास, नामस्मरणाचा सोहळा म्हणजेच दिवाळी मानणारी त्यांची धारणा, आणि भक्ती मार्गधरा असे सांगणारे त्यांचे ठाम प्रतिपादन या सर्व गोष्टी सावतामाळी यांचे संतमंडळीतील एकूण महात्मेपण व्यक्त करणाऱ्या आहेत. आषाढ वद्य १४ ही सावता माळी यांची पुण्यतिथी, (दि. १३ ऑगस्ट ९६) त्यानिमित्त त्यांचे हे पुण्यस्मरण!

ॐ ॐ ॐ

**ॐकारस्वरूपा सद्गुरु समर्था । अनाथाच्या नाथा तुज नमो ॥१॥**
**गुरुराव स्वामी आतां स्वप्रकाश । ज्यापुढें उदास चंद्र रवि ॥२॥**
**वेदां पडलें मौन शास्त्रें वेडावलीं । वाचा हे निमाली ते श्रीगुरु ॥३॥**
**श्रीगुरु जयासी पाहे कृपादृष्टी । तयासी हे सृष्टी पांडुरंग ॥४॥**
**प्रप्रभुराज माझा स्वामी गुरुराव । देतो मज भाव शुद्ध भूमि ॥५॥**
**भूमि शुद्ध करी ज्ञानबीज पेरी । अद्वैत हे धरीं मी तूं नेणें ॥६॥**
**मजलागीं माझीं सद्गुरु माऊली । कृपा करी साऊली वर्णूं काय ॥७॥**
**एका जनार्दनीं गुरु परब्रह्म । तयाचें पैं नाम सदा मुखीं ॥८॥**

# श्रीदत्तगुरुकरुणाष्टकम्

दत्तात्रेया तव शरणं । दत्तनाथा तव शरणम् ॥
त्रिगुणात्मका त्रिगुणातीता त्रिभुवनपालक तव शरणम् ॥१॥
शाश्वतमूर्ते तव शरणम् । श्यामसुंदरा तव शरणम् ॥
शेषाभरणा शेषभूषणा शेषशायि गुरु तव शरणम् ॥२॥
षडीजमूर्ते तव शरणम् । षड्भुजयतिवर तव शरणम् ॥
दंडकमंडलु गदापद्मकर शंखचक्रधर तव शरणम् ॥३॥
करुणानिधे तव शरण । करुणासागर तव शरणम् ॥
श्रीपादश्रीवल्लभ गुरुवर नृसिंहसरस्वति तव शरणम् ॥४॥
श्रीगुरुनाथा तव शरणम् । सद्गुरुनाथा तव शरणम् ॥
कृष्णासंगमतरुरवासी भक्तवत्सला तव शरणम् ॥५॥
कृपामूर्ते तव शरणम् । कृपासागरा तव शरणम् ॥
कृपाकटाक्षा कृपावलोकन कृपानिधे प्रभु तव शरणम् ॥६॥
कालांतका तव शरणम् । कालनाशका तव शरणम् ॥
पूर्णानंदा पूर्णपरेशा पुराणपुरुषा तव शरणम ॥७॥
जगदीशा तव शरणम् । जगन्नाथा तव शरणम् ॥
जगत्पालका जगदाधीशा जगदुद्धारा तव शरणम् ॥८॥
अखिलांतरा तव शरणम् । अखिलैश्वर्या तव शरणम् ॥
भक्तप्रिया वज्रपंजरा प्रसन्नवक्त्रा तव शरणम् ॥९॥
दिगंबरा तव शरणम् । दीनदयाघन तव शरणम् ॥
दीनानाथा दीनदयाळा दीनोद्धारा तव शरणम् ॥१०॥
तपोमूर्ते तव शरणम् । तेजोराशी तव शरणम् ॥
ब्रह्मानंदा ब्रह्मसनातन ब्रह्ममोहन तव शरणम ॥११॥
विश्वात्मका तव शरणम् । विश्वरक्षका तव शरणम् ॥
विश्वंभरा विश्वजीवना विश्वपरात्पर तव शरणम् ॥१२॥
विघ्नांतका तव शरणम् । विघ्ननाशका तव शरणम् ॥
प्रणवातीला प्रेमवर्धना प्रकाशमूर्ते तव शरणम् ॥१३॥
निजानंदा तव शरणम् । निजपददायका तव शरणम् ॥
नित्यनिरंजन निराकारा । निराधारा तव शरणम् ॥१४॥
चिद्घनमूर्ते तव शरणम् । चिदाकारा तव शरणम् ॥
चिदात्मरूपा चिदानंदा चित्सुखकंदा तव शरणम् ॥१५॥
अनादिमूर्ते तव शरणम् । अखिलावतारा तव शरणम् ॥
अनंतकोटिब्रह्मांडनायका अघटितघटना तव शरणम् ॥१६॥
भक्तोद्धारा तव शरणम् । भक्तरक्षका तव शरणम् ॥
भक्तानुग्रहभक्तिप्रिया । पतितोद्धारा तव शरणम् ॥१७॥



# शिरडी वृत्त

शिर्डी संस्थानच्या आय.टी.आय.च्या विस्तार भवनाचा भूमिपूजन समारंभ

## देणग्यांच्या सत्कारणी विनियोगावर कटाक्ष ठेवणार

**अध्यक्ष सुकथनकर यांची ग्वाही**

(विद्याधर ताठे यांजकडून)

**श्रीक्षेत्र शिरडी :** श्री साईबाबा संस्थानच्या वतीने श्री साईनाथ हॉस्पिटल, इंग्लिश मिडीयम स्कूल, कन्या शाळा असे अनेक समाजोपयोगी प्रकल्प चालविले जातात. आधुनिक जगातील व्यावसायिक शिक्षणाचे एकूण महत्त्व लक्षात घेऊन संस्थान तर्फे 'आय.टी.आय. शिक्षणाची सुविधाही एक खास संस्था काढून सुरू करण्यात आलेली आहे. या संस्थेसाठी लागणाऱ्या वाढत्या जागेची गरज भागविण्यासाठी संस्थानतर्फे नुकतेच एका नव्या इमारतीचे, माननीय अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी आ. टी. आय. परिसरात झालेल्या छोटेखाशा समारंभात माननीय अध्यक्षांनी आपल्या विश्वस्त मंडळाने गेल्या - दिडवर्षात केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आणि साईभक्तांना अधिकाधिक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी व माझे विश्वस्त मंडळ अधिकाधिक लक्ष केंद्रीत करीत असल्याची ग्वाही दिली. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी लागणारी भक्तांची लांबच्या लांब रांग लक्षात घेऊन उन-वारा-पाऊस यापासून रांगेतील भक्तांचे रक्षण करण्याबरोबर या रांगेतील काळ अधिकाधिक आनंददायक होण्याच्या दृष्टिने उद्‌बोधक मनोरंजन करण्याचाही एक उपक्रम आमच्यापुढे आहे असे ते म्हणाले.

श्री साईबाबांवरील प्रगाढ श्रद्धेने अनेकजण बाबांच्या चरणी दक्षणा व देणग्या अर्पण करतात. भक्ताने दिलेल्या या पैशाचा सत्कारणी विनियोग झाला पाहिजे, नव्हे तसा तो होत आहे अशी भक्तांची खात्री करून देण्याचा आमचा कृतीशिल प्रयत्न आहे. तसेच बाबांचे मंदिर ज्या शिरडीत आहे तेथील स्थानिक ग्रामस्थांच्या संस्थांकडून अनेक अपेक्षा आहेत. हे सर्व लक्षात घेऊन आम्ही अनेक उपक्रम हाती घेतलेले आहेत. संस्थानच्या शाळा, हॉस्पिटल, आय. टी. आय. या संस्था स्थानिक ग्रामस्थाच्यासाठीच आहेत. स्थानिक लोकांना इथे प्राधान्य दिले जाते ते एवढ्यासाठीच हे सर्व लक्षात घेऊन

संस्थान आमच्यासाठी काही करीत नाही अशी कोणी नाहक ओरड करणे बरोबर-न्या-ठरणार नाही अशा शब्दात मा अध्यक्षांनी मनोगत व्यक्त केले

मंदिर परिसर विकासासाठी घेण्यात येत असलेल्या आर्किटेक्चरल स्पर्धेची त्यानी यावेळी माहिती दिली व आलेल्या प्रवेशिकांचे लवकरच प्रदर्शन भरविण्यात येऊन साईभक्तांना त्या पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल असेही त्यानी सांगितले. संस्थानच्या एकूण कारभाराबरोबरच आमच्या शैक्षणिक संस्थामधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकडेही आम्ही यापुढे लक्ष पुरवू असे सांगून हे आव्हान संस्थेचे प्राचार्य - मुख्याध्यापक आणि अध्यापक वर्ग यांनी समर्थपणे स्वीकारावे असे श्री सुकथनकर म्हणाले.

या समारंभास संस्थानचे अनेक विश्वस्त, कार्यकारी अधिकारी, प्रशासन अधिकारी, आय. टी. आय चे प्राचार्य, शिक्षक, संस्थानचे सेवक व अनेक मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम अत्यंत प्रसन्न वातावरणात पार पडला. 'आय. टी आय.' च्या नव्या इमारतीचे बांधकाम या व्यवसायातील एक नामवंत श्री. बनकर पाटील हे करणार असून ते ठरल्या वेळेपूर्वी हे बांधकाम पूर्ण करतील अशी उपस्थितांकडून अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

१) शिरडी गावातील मारूती मंदिर नूतनीकरणाचे काम संस्थान मार्फत पूर्ण करून देण्यात आले.

२) शिरडी पोलीस स्टेशनच्या वापरासाठी पोलीस स्टेशनच्या मागे एक रूम देण्यात आली.

३) साईभक्तांच्या प्रवासातील सुरक्षीततेच्या दृष्टीकोनातून मुबई शिरडी रोडवर देर्डेगावी पोलीस चौकीचे काम सुरू केलेले आहे. ते लवकरच पूर्ण होईल.

४) सुलभ शौचालय: १२० संडास व १२० बाथरूम असलेल्या तसेच सामान ठेवणीसाठी लॉकरची सोय असलेल्या प्रसादालय परिसरातील इमारतीचे काम जोरात चालू आहे.

५) संस्थान लेखाशाखा व देणगी कार्यालय, शनीमंदीरासमोरील 'जुने भक्त निवास' येथे स्थलांतरीत करून अद्ययावत करणेत आले आहे. लेखाशाखेचा संपूर्ण कारभार एकत्रीकरण व सुसूत्रता पद्धतीने सुरू झाला आहे.

नुकत्यात संपलेल्या निवडणुका, उन्हाळ्याची सुट्टी आणि सुशिक्षितांमध्ये दिवसेनुदिवस वृद्धींगत होत असलेली धार्मिकता या सर्वांचा परिणाम येथील अलोट गर्दीवरून दिसत होता. विशेषतः या वर्षी आंध्रप्रदेशनंतर गुजरात व दिल्ली तसेच जम्मू काश्मीरकडील भक्तांची संख्या अधिक प्रमाणात होती दररोज अंदाजे ४० ते ६० हजारांवर लोक दर्शनासाठी येत. गुरूवार व रविवार रोजी हीच आकडेवारी एक लाखाच्या आसपास असे.

## मान्यवरांची शिरडी भेट

**या महिन्यामध्ये पुढील मान्यवरांनी श्री साईबाबांचे शिरडीत येऊन दर्शन घेतले.**

| | |
|---|---|
| एअर कमांडंट श्री. शुक्ला | दिल्ली |
| न्यायमूर्ती श्री कुलश्रेष्ठा | भोपाळ |
| नामदार गोपीनाथ मुंडे | |
| काँग्रेस प्रवक्ते बॅ. विठ्ठलराव गाडगीळ | |
| माजीमंत्री मुकुल वासनिक | |
| ले. जन. व्ही. एम. पाटील | नाशिक |
| मेजर जन. दुआ | नाशिक |
| जनरल एस. डी. सूद | नाशिक |
| न्यायमूर्ती मानेसाहेब | औरंगाबाद |
| विरोधीपक्ष नेते श्री मधुकरराव पिचड | |

ॐ ॐ ॐ

# आय.टी.आय. विस्तार भवनाचा भूमिपूजन समारंभ : क्षणचित्रे



संस्थानच्या आय.टी.आय. विस्तारित भवनाचे भूमिपूजन करताना अध्यक्ष
श्री. द. म. सुकथनकर व सौ. सुकथनकर



मा. अध्यक्ष श्री. सुकथनकर मुहूर्ताची कुदळ मारताना

# आय.टी.आय. विस्तार भवनाचा भूमिपूजन समारंभ : क्षणचित्रे




कार्यकारी अधिकारी श्री स.स.पेंडसे मुहूर्ताची कुदळ मारताना.



मा.अध्यक्ष महोदय श्री.सुकथनकर आपले विचार व्यक्त करताना.

# आय.टी.आय. विस्तार भवनाचा भूमिपूजन समारंभ : क्षणचित्रे



विस्तार भवनाच्या कोनशिलेजवळ मा.अध्यक्ष संस्थानचे विश्वस्त, कार्यकारी अधिकारी, प्रशासन अधिकारी आदी मान्यवर.





# साईप्रचिती

## भक्तांचे अनुभव



# साईनामस्मरणाचे महात्म्य

आजच्या धावपळीच्या युगात प्रत्येकजण आपले जीवन सुखी करण्याचा आपापल्यापरिने प्रयत्न करित असतो. मानवाने आज जरी शास्त्रीय तसेच शैक्षणिक प्रगती केली असली, अगदी त्याने आकाशात गुरूड झेप घेतली किंवा शिखरावर चढण्यात तो सफल झाला असला तरी त्याला ठराविक मर्यादेच्या बाहेर संकटांवर मात करता येणार नाही. त्यासाठी त्याने केवळ भक्तिमार्गच अवलंबिला पाहिजे. तो भक्ती मार्गानेच आपले जीवन सुखी करू शकेल.

भक्तीमार्गाची संकल्पना म्हणजे कोणाला काही उपवास तापास, व्रत वैकल्ये वाटेल परंतु तसे नव्हे. केवळ साईबाबांच्या नामस्मरणाने अनेक मोठी संकटे टळली आहेत तेव्हा कोठेही सदैव नामस्मरण करत रहा हे आपणास माझे सांगणे आहे. मला आलेला एक छोटासा अनुभव मी आपणांस सांगत आहे.

साधारणतः महिन्यापूर्वीची गोष्ट असेल मी दुपारी काही कामानिमित्त बाहेर जायला निघाले. भर दुपारची वेळ होती दुपारचा १/२ चा सुमार होता. बाहेर कडकडीत उन पडले होते जणूकाही सूर्याने रौद्र रूप धारण केले होते. त्यामुळे माझे आईबाबा मला म्हणाले तू रिक्षाने जा. मी नेहमी प्रमाणे बाहेर पडताना साईबाबांच्या फोटोची पूजा करून साईबाबांची उदी लावून निघाले. आणि मी एकटीच जात असल्याने नेहमीच्या सवयीने रस्त्याने सुद्धा मनातल्या मनात 'ॐ श्री साईनाथ' हा मंत्र (जप) चालू होता. मला रिक्षा मिळताच मी रिक्षात बसले आणि थोड्याचे अंतरावर वळणावर काही कळायच्या आतच रिक्षा एका बाजूला उलटली. त्यातून समोरून लॉरी येत होती पुढे काय होणार याची कल्पना सुद्धा करू शकत नव्हते. पण त्यातून मी साईबाबांच्या कृपेने स्वतःला सावरून उभी राहिले व साईबाबांचे नामस्मरण चालू ठेवले. अक्षरशः माझा पुर्नजन्म झाला. एवढा मोठा अपघात मुक्या मारावर निभावला. ते सुद्धा घरी आल्यावर मी साईबाबांची उदी लावून दुखणे कमी झाले.

त्या दिवशी मला साईबाबांच्या वचनाच्या प्रत्यय आला "तुमचा मी भार वाहिन सर्वथा! नव्हे हे, अन्यथा वचन माझे! खरोखर त्या दिवशी माझा सर्वभार साईबाबांनी घेतला आता मी त्यांच्या नामस्मरणाशिवाय जगूच शकत नाही म्हणूनच म्हणते. केवळ नामाने मोठे गडांतर टळते केवढी ही साईकृपा असून ही ती आठवण झाली की डोळ्यांत आश्रू तरळतात.

**भारती पुरुषोत्तम पेलनेकर,**
**ठाणे.**

# "जाको राखैं साईयाँ । मार सके ना कोय॥"

सा म्हणजे साक्षात. ई म्हणजे ईश्वरावतार. साई म्हणजेच ईश्वराचा अवतार. ज्याचा रक्षणकर्ता श्री साई आहे त्याच्या जवळ येण्यास काळसुद्धा घाबरतो.श्री साईबाबावरील अतूट श्रद्धेमध्ये किती महान अलौकिक सामर्थ्य आहे. याचा मला आलेला अविस्मरणीय अनुभव.

माझ्या छातीच्या डाव्या बाजूला सन १९७४ मध्ये दुखू लागले.म्हणून मी फॅमिली डॉक्टरांच्या सांगण्यावरून प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ.वेंगसरकर यांच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये गेलो.त्यानी एक्सरे, इ.सी.जी.वगैरे तपासणी केल्यावर माझ्या हृदयाची डावी बाजू जास्त रुंद झाली आहे व त्यामुळे दुखते. असे निदान केले व जास्त तपासणीसाठी त्यांनी परेलच्या के.इ.एम.हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होण्यास सांगितले. त्यानी मशीनद्वारा व स्कॅन केल्यावर त्यावेळचे हॉस्पिटलचे डीन डॉ.परुळेकर (प्रसिद्ध हृदयशल्य विशारद) याना दाखविले त्यानी हृदयाचे ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले.कारण हृदयातील डाव्या झडपेच्या खालच्या बाजूस लहानसे छिद्र पडल्यामुळे हृदयाच्या डावीकडील कप्प्यात प्रमाणापेक्षा जास्त रक्त फेकले जाते व त्यामुळे हृदयाची डावी बाजू जास्त रुंद झाली आहे.म्हणून ऑपरेशन शिवाय पर्याय नाही.कारण गोळ्या किंवा इंजेक्शनचा हृदयाच्या आतील भागावर परिणाम होणार नाही. व जर ऑपरेशन केले नाही तर हृदयाची रुंदावलेली डावी बाजू कालांतराने फाटण्याचा धोका आहे. म्हणून लवकरच ऑपरेशन करावे लागेल. नाहीतर जीवनास धोका आहे. असे गंभीरपणे सांगितले.

त्यानंतर ४-५ वर्षांनी छातीमध्ये पुन्हा दुखू लागल्यामुळे मी गिरगावातील जैन हॉस्पिटलमधील प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ.के.डी.शाह याना भेटलो. त्यांनी पूर्वीचे रिपोर्ट पाहून व अधिक तपासणी मशीनद्वारा करण्यासाठी एका हॉस्पिटलमध्ये भरती होण्यास सांगितले. कारण त्यावेळी परदेशातून हृदयाची सुस्पष्ट परिस्थिती दाखविणारी मशीन फक्त त्या हॉस्पिटलमध्येच होती. त्या मशीनद्वारा पुन्हा तपासणी केल्यावर हृदयातील झडपेला पडलले छिद्र जरा रुंदावले आहे असे पूर्वीचेच निदान केले. त्वरित ऑपरेशनच्या यशस्वितेची खात्री डॉ.देऊ शकत नव्हते.म्हणून मी ऑपरेशन करण्याचे नाकारले व श्री साईबाबांच्या ग्रंथाचे वाचन करण्यास सुरवात केली व त्यानाच हा हृदयरोग बरा करण्यासाठी रोज प्रार्थना करू लागलो.

त्यानंतर १९८६ साली जोरात चालताना किंवा जीना वगैरे चढताना माझ्या छातीत पुन्हा दुखू लागल्यामुळे मी ग्रॅंटरोडच्या 'भाटिया' हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. कारण त्या हॉस्पिटलमध्ये डॉ. सिद्धार्थ डगली हे हृदयरोग तज्ञ अमेरिकेतून व इंग्लडमधून पदवी व अनुभव घेऊन आले होते. त्यांनी माझ्या हृदयाची हॉस्पिटलमधील अद्यावत व संगणकयुक्त मशीनवर संपूर्ण छातीची हृदयाची तपासणी केली एक्स-रे व त्या मशीनवरील रिपोर्टवरून असे निदान केले की, पूर्वीचे झडपेला पडलेले लहान छिद्र आता जरा जास्त रुंद झाल्यामुळे हृदयाच्या डाव्या भागात प्रमाणापेक्षा जास्त रक्त फेकले जाते व त्यामुळे हृदयाची क्षमता ते सहन करू शकत नाही. म्हणून छातीच्या डाव्या बाजूस दुखू लागले.

त्यानी सर्व त्वरित ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. कारण हृदय केव्हाही डॅमेज होऊ शकेल असे त्यांनी आवर्जुन सांगून मी शिक्षक असल्यामुळे ते ऑपरेशनचा चार्ज काहीच न घेता फक्त रक्त, ऑक्सीजन व इतर जे साहित्य ऑपरेशनला लागेल त्याचाच खर्च फक्त मी करावयाचा असे सांगितले. पण वय जास्त झाल्यामुळे मी तो धोका पत्करला नाही व श्री साईबाबावर भरोसा ठेवून जेवढे जगता येईल तेवढे जगावयाचे असे ठरवले.परंतु डॉक्टरानी शेवटी स्पष्टच सांगितले की, जर त्वरित ऑपरेशन केले नाही तर मी जास्त वर्षे जगू शकणार नाही व शेवटी छातीचे दुखणे कमी होण्यासाठी गोळ्या वगैरे लिहून दिल्या.

शेवटी मी श्री साईबाबावर अढळ श्रद्धा व विश्वास ठेऊन त्यांच्या कृपाप्रसादाने जेवढे आयुष्य लाभेल तेवढे जगावयाचे असा निश्चय केला. पूर्वीपासून मी रोज आंघोळ केल्यावर साईबाबांची उदी कपाळाला लावून थोडी तोंडात टाकत असे व रोज "श्री साईसत्चरित्र या ग्रंथाचा अर्धा अध्याय वाचीत असतो. यामुळेच तीन सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ञानी माझ्या मृत्युचे ठाम भविष्य सांगूनसुद्धा मी आजपर्यंत वयाच्या ६१व्या वर्षी श्री साईकृपेने जिवंत आहे. आता मी नोकरीतून निवृत्त होऊन साईकृपेने पेन्शन घेऊन आनंदाने जीवन जगत आहे.



माझ्याप्रमाणेच अनेकांना श्री साईबाबांच्या अलौकिक महान सामर्थ्याची प्रचीती कधी ना कधी आल्या शिवाय रहाणार नाही. कारण साईबाबाच म्हणतात :-

"नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य।"

श्री. बी. व्ही. सावंत
मुंबई

ॐ ॐ ॐ

## तरी मी धावेन भक्तांसाठी

माझी परीक्षा संपली, पेपर्स छान गेलेत. मला परीक्षा होण्यापूर्वी मन प्रसन्न, सुंदर स्वप्न पडले ते असे - मी स्वप्नामध्येच नवापूर गावातील सरदार चौकातल्या श्रीगणेश मंदीरात जात असते. रस्त्यात माझी मैत्रीण भेटते, वेळ जायला नको म्हणून मी तिच्याशी खोटं बोलून तिला टाळते.

मंदीरात येऊन श्री गणेशाला वंदन करते व म्हणते हे गणराया खोटं बोलले त्याबद्दल क्षमा करा. परीक्षेत यश मिळावे म्हणून प्रार्थना करते. अचानक माझे लक्ष कोपऱ्यात जाते तर काय! तिथे भगवान श्री साईबाबांची सुंदर मूर्ती (बैठी) दिसते. कोण विलक्षण आनंद होतो मला मी बाबांना वंदन करते. परीक्षेच्या यशाच मागणं मागते. काय आश्चर्य? तिथं प्रत्यक्षात बाबाच प्रकट होतात - मला म्हणतात - बाळ, खोटं का बोललीस?

बाबांना मी खोटं बोलण्याचे कारण सांगते व खोटं बोलले म्हणून क्षमा याचना करते, अन् म्हणते बाबा! माझं वाचलेलं लक्षात राहात नाही, मला - आशीर्वाद द्या.

बाबा मला प्रसाद म्हणून मनुका देतात उजव्या हातात तांदूळ दाणे टाकतात अन् म्हणतात परीक्षेला जाताना हे सोबत ने! तुझं मंगल होईल! मी आनंदून जाते दृश्य संपते

बाबांचा महिमा अपरंपार आहे हे खरं ठरलं बरोबर चार दिवसांनी बाबांचे निष्ठा[illegible]क[illegible] शाह माझे घरी येतात माझा मोठा भाऊ सहजगत्या त्यांना प्रश्न करतो, काका, आमच्या दोघांच्या वाचलेलं लक्षात राहात नाही।

त्यावर उपाय म्हणून काका आपल्या बॅग मधून शिर्डीतली बाबांची उदी (रक्षा) दोन छोट्या पुडीमधे देतात. परीक्षेला जाते वेळी उदी कपाळाला लावा थोडी तोंडात टाका व पुडी बरोबर राहू द्या. याने तुम्हाला परीक्षेचे संकट पडणार नाही.

मला स्वप्न खरे ठरेल याचा आनंद झाला. मी त्यांना बाबा समजून प्रणाम केला. कारण त्यांनी प्रसाद म्हणून

शक्तीशाली उदी (रक्षा) शिर्डीहून आणली ती दिली. काय सांगू तुम्हाला.पेपरही सुंदर लिहिले सार काही आठवलं.सारी काही बाबांचीच कृपा! हा कृपाआशीर्वादच नाही का?

**प्रिती सोनवणे**
**नवापूर (धुळे)**

## बाबांचे प्रत्यक्ष दर्शन

माझे साई लिला अमृत या ग्रंथाचे पारायण चालू होते. दिनांक ९-४-९६ रोजी ११.३० वाजता मी घरून माझी गाडी चालू केली शिर्डी वरून श्री साईबाबांचे दर्शन घेऊन यावे या उद्देशाने निघालो. राहाता पासून थोडे अंतर गेल्यानंतर मध्येच ओढा लागतो. त्या ओढ्याच्या पुढे मी भरधाव वेगाने जात होतो.व समोर एक फकिर येतांना दिसला त्याने मला जोरात आरोळी दिली व थांबण्यास सांगितले.मी गाडी उभी करीत असतांना शंभर ते दिडशे फुट अंतर पुढे गेलो काही क्षणात ते बाबा माझ्याजवळ हजर व त्यांनी माझ्याकडे एक रुपयाची मागणी केली मी गाडी स्टँडवर उभी केली व खिशामध्ये पैसे पाहण्यास सुरवात केली माझ्याकडे एक रुपया सुट्टा नव्हता.तेवढ्या वेळात मी पन्नास रुपयाची नोट हातात काढली व सुट्टे नाही म्हणून तशीच हातात ठेवली तर तो फकीर म्हणाला, "हमे पैसे नही पंधरा नारियल चाहिए हम तिरुपती जा रहें है" परत मला उलट प्रश्न विचारला की "हम कहा जा रहें? मला तो फकीर म्हणाला, "तेरे पास तो बहुत पैसा है हमे दे." मैने हा कह दिया. मी दिडशे रुपये काढून दिले. त्यानंतर त्या बाबाने त्याच्या झोळीमध्ये हात घातला.

आपण विज्ञान युगामध्ये वावरतो आहे व हा कोणी तरी भोदु, लबाड माणुस आपला व्यर्थ वेळ घेत आहे. त्यामुळे मी त्या बाबांच्या कृतीकडे बारकाईने निरीक्षण करीत होतो. त्या बाबाच्या अंगावर साईबाबासारखाच अंगरखा, डोक्याला फडके व लुंगी हे सर्व कपडे पांढऱ्या रंगाचे होते. व पायात चप्पल नव्हती खांद्यावर हिरवी झोळी उंची अंदाजे सहा-साडेसहा फुट असावी हात बरेच लांब होते.रंग काळा सावळा होता.थोडी दाढी वाढलेली होती.एकूण व्यक्तीमत्व मुसलमान समाजाचे वाटत होते.

त्या बाबाने झोळीमधे हात घातला व दोन मिनिटानंतर त्यामधून काहीतरी वस्तू बाहेर काढल्या व मला सांगितले 'तेरे जेबमे कागद है बाहर निकाल' मी कागद बाहेर काढला त्यांच्याकडे दिला. त्यांनी झोळीमधून थोडीशी काळी माती बाहेर काढली व थोडे काळे जव, गहु काढले कागदावर ठेवून दिले. मी बोलण्याच्या नादामध्ये ती पुडी वरच्या खिशातच ठेवली व त्यांनी मला विचारले "तेरे पास बहुत पैसे है" माझ्याजवळ फक्त दिडशेच रुपये होते ते म्हणाले 'मुझे पैसे देगा' मी होकार दिला परंतु "हे तुझे कामाचे पैसे आहेत की जे तुला कॅनाल पाटकरी याला देण्यासाठी तू घरून घेतलेले आहे.मुझे कैसे देता है तुझे क्या अधिकार है" माझे पैसे परत माझ्या खिशात घातले व माझा हात हातात घेतला व म्हणाले "मेरा स्मरण करोगे" "मै घर आ गया तो मुझे भोजन खिलायेगा"

या नंतर त्यांनी मला दिलेली उदीची पुडी परत मागितली.ती पुडी बाहेर काढली व त्यांच्याकडे हात पुढे केला. ते म्हणाले, "खोलो उसे खोलकर देखो" माझ्या मनामध्ये आले यामध्ये माती होती व तीच असणार आत्तापर्यंत माझ्या त्या बाबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कोणी तरी भोदु, लबाड, भामटा फकीर आपला व्यर्थ वेळ घेत आहे. असे वाटले मी ती पुडी उघडली तर त्यामधे एक रुपयाचे एक नाणे व पंचवीस पैशाचे एक नाणे तसेच दहा पैशाचे एक नाणे असे एकूण एक रुपया पस्तीस पैसे तयार झालेले होते.

मला थोडी शंका यावयास लागली व मी थोडा आश्चर्य चकीतही झालो.कोणीतरी उच्च प्रतीचा भोदु आहे.आपल्याला काय करायचे म्हणून मी मुद्दामच दर्शन घेऊ द्या म्हणून विनंती करू लागलो इच्छा नसतानाही मी दर्शन घेतले. त्या बाबाने माझ्याकडून घेतलेले पैसे परत मला दिले.व मला सांगितले,
"मेरा स्मरण करोगे"
मै घर आ गया तो मुझे भोजन खिलायेगा"
"मुझे भुखा तो वापस नही लौटेन पडेगा"

"आता मला त्या बाबाचा खुप राग आला होता.मी चेष्टेने बाबाला नाव विचारले. काही तुमचे नाव काय? ते म्हणाले, "साईनाथ"

"हम तिरुपती जा रहे है हमे पंधरा नारियल चाहिए तु देगा अभी और इसी वक्त," जवळपास कुठेही दुकान नव्हते. मी विचार केला बाबाला शिर्डीस घेऊन जाऊ व नारळ घेऊन

देऊ मला उत्तम हिंदी बोलता येत नव्हते त्यामुळे मी बाबांना विचारले का हो तुम्हाला मराठी बोलता येत नाही का? त्यांनी शुद्ध मराठीत बोलावयास सुरवात केली व मला म्हणाले तुला मी प्रसाद देतो.

त्यांनी परत आपल्या झोळीमध्ये हात घातला बराच वेळ शोधल्यानंतर एक साईबाबांचा समाधीचा अत्यंत आकर्षक फोटो दिला व मला सांगितले,

१) एक रुपया हमेशा के लिऐ पुजन मे रखना

२) और यह फोटोभी पुजा मे रखना

फोटो माझ्या हातात दिला व मला विचारले तुम कहा जार रहे हो. मी शिर्डी येथे साईबाबाच्या दर्शनाला चाललो असे सांगून मला घरी भरपुर कामे आहे लवकर जाणे गरजेचे आहे. असे सांगितले शिर्डीला दर्शनाला जावू का म्हणून विचारले आत्तापर्यंत पंधरा मिनिटे झालली होती त्यानी माझ्या हातातील फोटोकडे अंगुली निर्देश करीत मला विचारले "तु यांना ओळखतो का? तुझे दर्शन झाले तु वापस घर जाओ तुम्हारा दर्शन हो गया." मला शिर्डिला जावून साईबाबांची दर्शन घेण्याची तीव्र इच्छा होती. तुम्हारा दर्शन हो गया तु वापस घर जाओ असे ते मला दोनदा म्हणाले तेवढ्या वेळात मी फोटोचे बारकाईने निरिक्षण केले तर तो फोटोची साईबाबांच्या हृदयाजवळ काच फुटलेली होती तीला तडे गेलेले होते. मी चेष्टेनेच बाबांना विचारले का हो हा फोटो फुटलेला कसा आहे. मला फुटलेला का दिला? "ते म्हणाले **तेरा मन फटा हुआ है.**"

त्यांनी दिडशे रुपये दोनदा झोळी मध्ये ठेवले व परत मला दिले. मला त्यांनी गाडी मागे वळवण्यास लावली. माझ्याजवळ परत उभे राहिले माझा हात हातात घेतला आणि म्हणाले,

"मेरा स्मरण करोगे

मै घर आ गया तो मुझे भोजन खिलायेगा

मुझे भुखा तो नही वापस लौटना पडेगा"

मी होकार दिला व गाडी चालू केली.

'हमें भी आना है' हम तिरुपती जा रहे है तुम पंधरा नारियला देते होना. असे म्हणत ते गाडीवर बसले लुंगी असल्यामुळे ते एकीकडे पाय करून थोडक्यात लेडिज बसतात तसे बसले मी विचारले, बाबा आप फिर कब मिलेंगे त्यांनी सांगितले सपने मे मिलुंगा.

तुझ्या वडीलांच्या पुर्व पुण्याइने व गोदावरी आईने तुला वचन दिल्याप्रमाणे मी भेट दिली आहे माझा हात परत हातात घेतला व मला गाडी बंद करण्यास सांगितले व तुम घर जाओ हमें तिरुपती जाना है


मी घराकडे निघालो काही अंतर जाऊन मागे पाहिले असता फकीरही नाही व कुणीही नाही

त्यांनी दिलेल्या वस्तू माझ्याजवळ आजही आहेत

१) एक रुपया पंचवीस पैसे व दहा पैसे

२) प्रत्यक्ष साईबाबाने दिलेला फोटो

- एकनाथ डांगे




## कौतुकास्पद सेवा


गेली काही वर्षे 'श्री साईलीला' च्या रामनवमी अंकाचे रंगीत मुखपृष्ठ **अजय लॅमिनेटर्स** मुंबई याचेकडून श्री बाबाची सेवा म्हणून विनामूल्य लॅमिनेशन करून दिले जाते. यदाही त्यानी आपली सेवा चोखपणे पार पाडली असून त्याच्या या कौतुकास्पद सेवेबद्दल श्री साईलीला तर्फे त्यांना श्री बाबाचा शुभाशिर्वाद.

ग्रंथपरिचय

विज्ञानंद

# नित्य उपयोगी संग्राह्य प्रकाशने

मराठी साहित्य क्षेत्रात सातारच्या कौशिक प्रकाशनाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकाशनांनी एक विशेष स्थान निर्माण केले असून हरहुन्नरी व्यक्तित्त्व म्हणून ओळखले जाणारे, श्री अरुण गोडबोले यांच्या व्यवहारकुशल, यशस्वी उद्योजकतेचेच ते एक दालन आहे.




या प्रकाशन संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात आलेले **'समग्र श्री मनाचे श्लोक : एक मागोवा'** हे पुस्तक समर्थ वाङ्मयाची आवड असणाऱ्यांना एक पर्वणीच आहे असे आम्हास वाटते. दैनिक वृत्तपत्रात श्री अरुण गोडबोले यांनी लिहिलेल्या वाचकप्रिय अशा स्तंभातील नित्य लेखनाचे ते संकलन असून रोज एका श्लोकावरील चिंतन वाचण्यास अत्यंत सुटसुटीत व सुलभ आहे. पुस्तकाच्या या स्वरूपामुळे व गोडबोलेंच्या रसाळ निरूपणामुळे हे पुस्तक अनेकांच्या नित्यपूजापाठातील एक नित्यपाठाचा विषय झाला तर आश्चर्य ठरू नये.

मनाच्या श्लोकावरील या पुस्तकाप्रमाणेच या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या **'संस्कारधारा' व 'श्रीरामपाठ'** या दोन हस्तपुस्तिका सुद्धा सर्वांनी घरोघर ठेवण्या इतक्या संग्राह्यच नव्हे तर नित्यपठणीय आहेत. आजकाल पाठांतराची शालेय शिक्षणातून हकालपट्टी झालेली आहे. बाल विद्यार्थी टी. व्ही. पाहून पाहून आजकाल केवळ बघे झालेले आहेत. अशा या काळात सुज्ञ मातापित्यांनीच मुलांना काही नित्यपाठ शिकवण्याची व त्यांच्या समवेत स्वतः म्हणण्याची गरज आहे. ही गरज ओळखूनच की काय कौशिक प्रकाशनाने [illegible] अत्यंत उपयुक्त अशा या दोन हस्तपुस्तिका काढण्याची फार मोठी सांस्कृतिक कामगिरी केलेली आहे.

'संस्कारधारा' हस्तपुस्तिकेत प्रातःस्मरण, गणेशस्तवन, मनाचे श्लोक, सूर्यनमस्कार, गायत्री मंत्र, गणपती अथर्वशीर्ष, मारुती स्तोत्र, रामरक्षा, मंत्रपुष्पांजली आदींचे संकलन करण्यात आले आहे तर 'श्रीरामपाठ' हस्तपुस्तिकेत सौ. वासंती देशपांडे रचित, गोंदवलेकर महाराज प्रणित रसाळ अशा काव्य रचनांचा समावेश आहे. उदाहरणार्थ - रामाचिया पाशी । बैस क्षणभरी। सुखाने उच्चारी। राम राम॥१॥ ज्ञानदेवांचा हरिपाठ सर्वश्रुत आहे, तसाच हा रामपाठ सौ. देशपांडे यांनी लिहिलेला आहे. तो राम भक्तांना व बालकांना सहजपणे गुणगुणता येईल इतका प्रासादिक आहे.

कौशिक प्रकाशनाची वरील प्रकाशने प्रत्येक सुसंस्कृत माणसाने आवर्जुन आपल्या संग्राहात ठेवावीत व आपल्या व आपल्या मुलांच्या नित्यपाठाची अविभाज्य घटक बनवावीत असे सूचवावे वाटते.

१. समग्रमनाचे श्लोक : एक मागोवा
अरुण गोडबोल / पाने ४४० / किमत १४४ रु.
२. संस्कारधारा (छोटी पुस्तिका) ६४ पाने ५ रु.
३. श्रीरामपाठ (छोटी पुस्तिका)
सौ. वासंती देशपांडे /
पाने ६४ / किमत ५ रु
कौशिक प्रकाशन ६.९ शनिवार पेठ, सातारा

ग्रंथपरिचय

विद्यानंद

# भक्त पुंडलिक : प्रासादिक रसाळ चरित्र

विदर्भाच्या पुण्यभूमीतील अकोला जिल्ह्यातील 'मुर्तिजापूर' चे नाव परमहंस पुंडलिक बाबा यांच्या सानिध्याने पावन झालेले स्थान म्हणून सर्वपरिचित आहे. पुंडलिक बाबांच्या लीला हा भक्तभाविकांच्या चर्चेचा व आकर्षणाचा मोठा विषय असून अशा पुंडलिक महाराजांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारे 'पुंडलिका भेटी' नावाचे पुस्तक नुकतेच प्रकाशित झालेले आहे.

पुंडलिक बाबांचे एक भक्त व संतसज्जनांच्या सहवासाचा ज्यांना छंद आहे असे कोल्हापूरचे श्री संजय वाघ यांनी हे पुस्तक लिहून पुंडलिकबाबा भक्तांची वि-होष सोय केलेली आहे. १३० पानाच्या अवतारकार्याचे सुरेख दर्शन घडविलेले आहे.

नदीचे मूळ आणि संन्यासी-अवलिया यांचे कुळ शोधू नये म्हणतात. त्यामुळे पुंडलिक बाबा या जन्म कोठे झाला? बालपण कोठे गेले? या गोष्टींना महत्तव नाही हे खरे तरी पण भाबड्या भक्तांची जिज्ञासा लक्षात घेऊन लेखकाने पुंडलिक बाबांच्या कुलपरंपरेचा बालपणाचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. पैठण जवळील 'मुंगी' हे पुंडलिक महाराजांच्या पातोंब या धनगर कुळाचे मूळगाव. तेथून कोणीकाळी हे पातोंड अकोला जिल्ह्यात गोरेगाव येथे येऊन स्थाईक झाले. या गोरेगावातच पुंडलिक बाबा यांचा श्री खंडूजी व मंजूळा यांच्या पोटी जन्म झाला. गोरेगावात एका उत्सवानिमित्त गावकऱ्यांचे नाटक चालू होते. या नाटकात श्री खंडूजीसुद्धा इतर गावकऱ्यांप्रमाणे कलाकार म्हणून सहभागी होते. या नाटकाच्या वेळीच इकडे सौ. मंजुळाताईंना पुत्रप्राप्ती झाली. त्यामुळे पुत्राचे नाव 'पुंडलिक' ठेवण्यात आले. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात तसेच हे बाळ कोणी सामान्य नसून कोणी महात्मा-संत-अलौकि पुरुष असल्याचे त्यांच्या जन्मापासूनच अनेकांना जाणवले. त्या प्रसंगांचे घटनांचे लेखकाने पुस्तकात सविस्तर वर्णन दिलेले आहे. ते जिज्ञासूनी मूळातूनच वाचणे योग्य ठरेल.

पिंपळोदंचे अवलिया परशरामबाबा एकदा गोरेगावी आले असता विवस्त्र अवस्थेत स्वछंदीपणानें हिंडणाऱ्या पुंडलिकास पाहून ते 'मन्या-मन्या' म्हणत त्याला जवळ बोलवू लागले. जन्मापासून ७ वर्षे एकही शब्द न बोलल्य पुंडलिकाचे तोंडून त्यांना पाहून 'गोविंद राधे गोविंद' असे शब्द बाहेर पडले. मुलगा मुक्का आहे ही आईवडिलाची चिंता दूर झाली आणि या घटनेने मुलाच्या ठायी असलेले अलौकिकत्व गावकऱ्यांना परिचित झाले. विषारी नाग-सापाशी त्याचे मुक्तपणे खेळणे हाही सर्वत्र कुतुहलाचा विषय झाला.

गोरेगावातील एक सरदार परगावी जाताना वाटेतील एका साधूस नमस्कार करू लागले तेव्हा तो साधू म्हणाले 'अरे तुझ्या गावात साक्षात देव असताना तू आमच्या काय पाया पडतो.' यावर सरदार स्तंभित झाला व त्याने नाव विचारले. साधू म्हणाले, 'तू त्याला शोधू नको उद्या सकाळी जो तुझ्याकडे येऊन हार-फुटाणे मागेल तोच तो आहे.' दुसरे दिवशी सकाळी सरदारच्या दारावर थाप पडली पाहतो तो दारात खंडूजी धनगराच पोरग पुंडलिक. आज पाहिजे असे विचारताच ते पोरग म्हणाले 'आम्हाला हार-फुटाणे द्या गाऊ' हे वाक्य ऐकताच सरदाराचा विश्वासच बसेना. त्याने चटकन स्वतःस सावरले व देव समजून बाल पुंडलिकाची पूजा केली. पुंडलिकाचे वडिल खंडूजी यांनी सरदारांची थट्टा करून अशी पूजा करू नये म्हणून सांगितले पण सरदारभाऊंनी ऐकले नाही. पुढे अल्पावधीतच पुंडलिकाचे अलौकिकत्त्व सर्वांच्या लक्षात आले आणि बाल पुंडलिकाचे 'भक्त पुंडलिक' पुंडलिक बाबा झाले.


धामणगाव येथील प्रसिद्ध संत मुंगसाजी देव, संत गाडगेमहाराज यांच्यासह अनेकांनी पुंडलिकाचे अलौकिकत्व लोकांच्या लक्षात आणून दिले आणि पुंडलिकबाबा भक्त भाविकांचे, एक श्रद्धास्थान झाले. त्यांच्या लीला अतर्क्य व अगम्य अशा आहे. त्यांना कृष्णावतार मानले जाते. ९ आक्टोबर १९९५ मध्ये पुंडलिकबाबा समाधिस्त झाले. मूर्तिजापूर येथील पुंडलिकनगरमध्ये त्यांचे समाधीमंदिर आहे.

या पुस्तकास श्री गजाननमहाराज(शेगाव) संस्थानचे श्री शिवशंकर पाटील, ज्येष्ठ विचारवंत बाळासाहेब भारदे यांच्या प्रस्तावना आणि श्रीक्षेत्र काशी येथील जंगमवाडी मठाचे जगद्‌गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचा शुभाशिर्वाद लाभलेला आहे.

**भक्त पुंडलिक** : लेखक कुमार संजय वाघ

**प्रकाशक** : पुंडलिक महाराज संस्थान, मुर्तिजापूर, अकोला, पाने १३० किंमत - २१/-

# अभिप्राय...




'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी, इंग्रजी आणि मराठी प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे. असे अनेक मान्यवरांचे मत आहे.

'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय

## संपादन उत्तम, वाचनीय चिंतनीय अंक

रामनवमीच्या अंकाचे मुखपृष्ठ नयनरम्य वाटले तसेच अंकातील सर्व लेख चिंतनीय आहेत. स्व. महात्मा गांधी, राम मनोहर लोहिया, प्रतिभावंत पत्रकार शि. म. परांजपे यांच्या श्रीरामपर लेखाचे संकलन व संपादन उत्तम आहे. विचारवंताचे लेख देऊन श्री साईलीला वाचनीय चिंतनीय केल्याबद्दल शतशः धन्यवाद.

बी. व्ही. सावंत भोसले
पंडित, साहित्य विशारद, कुर्ला मुंबई

## शिर्डी वृत्त आवडले


मार्च-एप्रिल ९६ च्या अंकातील आपण दिलेले शिर्डी वृत्त वाचून शिर्डीचे दर्शन घडले मनास खूप आनंद वाटला आपणास धन्यवाद शिरडीवृत्त असेच सविस्तरपणे पुढील सर्व अंकात द्यावे. शिरडीवृत्त दिल्याबद्दल धन्यवाद.

एच. आर. पवार
दाहोद (गुजरात)

## सर्व लेख उत्कृष्ट

एप्रिल - ९६ च्या अंकात मागील वर्षीची रामनवमीची क्षणचित्रं देण्याची कल्पना खूपच आवडली ती पाहाताना आम्हाला आपण शिरडीत आहोत असेच काहीकाळ वाटले अंकातील सर्व लेख उत्कृष्ट आहेत. अशाच नामवंत - विचारवंताचे लेख पुढील अंकात आम्हाला वाचावयास मिळावेत ही अपेक्षा आहे.

एम. व्ही. अरुण, घाटाव रोहा (रायगड)




'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी, इंग्रजी आणि मराठी प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे. असे अनेक मान्यवरांचे मत आहे.

'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय

## मांडणी खूप छान

रामनवमीच्या अंकातील मर्यादापुरुषोत्तम राम हा शि. म. परांजपे यांचा आणि नित्य विजयी रघुनंदन हा विद्याधर ताठे यांचा लेख अत्यंत वाचनीय वाटले अंकाची मांडणी व लिखाण खूपच छान वाटले.

मनोहर भराडिया
सेलू (परभणी)

## संग्राह्य अंक

लिहीण्यास कारण की आपला मार्च-एप्रिल ९६ चा रामनवमी विशेषांक वाचला. अंक खरोखरच वाचनीय आणि संग्रहणीय आहे. विशेष म्हणजे एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच मिळाला. जणू काही हे द्विमासिक नसून मासिकच आहे असे वाटले. त्यातल्या त्यात हा रामनवमी विशेषांक होता तरी देखील अगोदर मिळाला. यातील लेख खूपच अभ्यास पूर्ण आणि ज्ञानात भर टाकणारे आहेत.

सुरुवातीलाच अध्याय ६ वा हा रामनवमी उत्सवाची माहिती देणारा आहे. त्यामुळे आरंभ सुंदर झाला. 'मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम' या स्व. म. म. बाळशास्त्री हरीदास यांच्या लेखातून प्रभावी, अभिजात नेतृत्व लाभलेल्या श्रीरामाची माहिती मिळाली. त्यावरून श्रीराम कर्तव्याचा उपदेश आपल्यापेक्षा लहानांना तर देत होतेच पण वडील दशरथ यांनाही देत होते हे कळले.

राष्ट्रपिता महात्मा गांधीचा रामनामाची महती सांगणारा दुर्मिळ लेख म्हणजे भक्तांना मेजवानीच होय.

थोर चिंतक डॉ. राम लोहियांचा लेख खरोखरच चिंतनीय आहे. शि. म. परांजपे यांचा लेख अभ्यासपूर्ण आहे. श्री. विद्याधर ताठे कार्यकारी संपादक श्री साईलीला यांचा 'नित्य विजयी रघुनंदन' हा लेख त्यांच्या वारकरी संप्रदायाच्या सखोल अभ्यासाचे जणू काही चित्रणच वाटले अनेक अवतरणे घेऊन केलेले निवेदन म्हणजे जणू पंचपक्वानांचे भोजन होय.

रामराज्यातील न्यायदान या लेखाद्वारे संपूर्ण रामायण पाहिल्यावर जी माहिती सर्वसाधारण वाचकाला नव्हती ती सखोल माहिती मिळाली.

संत तुलसीदासांचा श्रीराम ही हिंदी भाषेतील माहिती मराठी




'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी, इंग्रजी आणि मराठी प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे. असे अनेक मान्यवरांचे मत आहे.

'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय

वाचकांना प्रथमच मिळाली.
विशेषांक खरोखरच दृष्ट लागावा असाच (छपाई व मुखपृष्ठासह) आहे.
आपणास विनंती की श्री साईलीलेचे स्वरूप असेच कायम ठेवावे. नव्हे दिवसेन दिवस वृदींगत व्हावे हीच साईचरणी प्रार्थना

**(अरविंदराव शिंदे उप अभियंता (निवृत्त)उमरी अकोला)**

## संपादकीय आवडले

आपले संपादकीय व तीर्थक्षेत्र विशेषांकातील माहिती व लेख आवडले.

**सौ. उमा भांडारे (संस्थापक)**
**वृध्द सेवा संघ, नौपाडा ठाणे.**

## अंक अगदी वेळेवर मिळाला

श्री साईलीला मे-जून ९६, तीर्थक्षेत्रविशेषांक हे मासिक आम्हा सर्वांना खूप आवडले. हे मासिक आम्हास गुरुवार दि. २७।६।९६ रोजी बरोबर दुपारी १२ वाजताचे सुमारास मिळाले. सर्व प्रथम दिलेले अष्टविनायकाचे दर्शन खरोखरी प्रत्येकाने करायला हवे. आपण सर्व स्थळांची तंतोतंत माहिती दिलेली आहे. 'श्री साईबाबांची लिलानगरि' शिर्डीची माहिती दिलेला लेख, गिरनार यात्रा, दत्ताची तीर्थक्षेत्रे वाचून मन अक्षरशः भरून गेले.

आता अंक अगदी वेळेवर मिळतात ही साईचीच कृपा आहे. साईलीला मासिकाचे नवे स्वरूप फारच आवडले. मासिकाची अशीच भरभराट होवो हीच साईचरणी प्रार्थना.

**सौ. विमल परदेशी**
**प्रतापगंज सातारा**